06 TO 12 MARCH 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 3/4/2023 8:39 PM Page 1


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ११ सोमवार दि. ०६ मार्च २०२३ ते रविवार दि. १२ मार्च २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## शुल्लक कारणावरून चिडला फार मुलाने केले आपल्या बापाला ठार

हिंगोली/क्राईम रिपोर्टर

आजकालची मुले कोणाचे ऐकत नाहीत. आई-वडिलांशी छोट्या छोट्या कारणावरून वाद घालतात. काही मुले तर रागाच्या भरात आई-वडिलांवर हात उचलतात, त्यांना शिवीगाळ करून घराबाहेर काढतात. मात्र हिंगोली जिल्ह्याच्या बासमत तालुक्यातील सेलू गावात एका अल्पवयीन मुलाने शुल्लक कारणावरून बापाच्या मानेवर कुऱ्हाडीचा घाव घालून त्याची हत्या केली आणि कुटुंबाने हे कृत्य लपवण्यासाठी मृताच गुपचूप अंत्यविधी करण्याचा ...पान २ वर

## नात्यातील 'लव्ह स्टोरी'ची अखेर शोकांतिका झाली मावस बहिणीला ठार मारून त्याने आत्महत्या केली

सातारा (खटाव)/प्रतिनिधी

भाऊ, बहिण सख्खे असोत, चुलत असोत, दूरच्या नात्यातले असोत, भारतीय संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते अत्यंत पवित्र मानले जाते. या नात्यात भावाला राखी बांधून आपल्या कुल शीलाच्या रक्षणाची जबाबदारी तिने त्याच्यावर सोपवलेली असते. त्यामुळे या नात्यात अत्यंत पावित्र्य असायला हवे. बहिण भावाच्या नात्याला समाजात एक वेगळे स्थान आहे. अशावेळी एका गावात राहणाऱ्या आणि एका गोत्रातील असलेल्या तरुण तरुणीलाही एकत्र यायला समाजाची परवानगी नसते तशी सामाजिक बंधनेच असतात आणि हि बंधने झुगारून कोणी एकत्र येण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबावर बहिष्कार टाकला जातो किंवा सामाजिक बंधने झुगारून एकत्र आलेल्या तरुण-तरुणीला जगण्याचा हक्क समाजाकडून नाकारला जातो. त्यातूनच सैराट सारख्या ओनर किलिंगच्या घटना घडतात आणि नात्यातील प्रेमिकांना त्यांचा जीव गमवावा लागतो. मात्र असे असतानाही आजकाल नात्यातच प्रेमसंबंध आणि पुढे लैंगिक संबंधाच्या घटना घडतात. पण अशा लोकांना समाज माफ करीत नाही आणि हे ढाऊक असताना कराड तालुक्यातील शामगावमध्ये राहणाऱ्या दत्तात्रय नावाच्या तरुणाचे त्याचीच मावस बहीण असलेल्या स्नेहलशी प्रेम जुळले. मात्र स्नेहलच्या आईला हे कळताच तिने ताबडतोब स्नेहलचे दुसऱ्या गावातील तरुणाशी लग्न लावून दिले. काही दिवस गेल्याने स्नेहल दत्तात्र्यला विसरून गेली, पण दत्तात्रय मात्र स्नेहलला विसरू शकत नव्हता. कारण ती त्याचे पहिले प्रेम होते आणि पहिले प्रेम सहसा विसरता येत नाही. त्यामुळे दत्तात्रय स्नेहलसाठी वेडापिसा झाला होता. इकडे स्नेहल गर्भवती झाली हे समजताच दत्तात्रय भयंकर चिडला आणि सरळ तिच्या घरी जाऊन त्याने गर्भवती स्नेहलची हत्या केली. तसेच स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली.



कराड तालुक्यातील शामगाव येथील स्नेहल वैभव माळी हिचे गेल्या चार पाच महिन्यापूर्वी कराड तालुक्यातील शामगाव येथील एका तरूणाशी समाजाच्या रिती रिवाजा नुसार विवाह झाला. मात्र लग्नापूर्वीच स्नेहल हिचे वाझोंळी येथील दत्तात्रय माळी या नात्यातील तरूणासोबत प्रेमसंबंध निर्माण झाले होते. दत्तात्रय हा तिला नात्याने मावस भाऊच लागत होता. त्याचे ही तिच्यावर मनापासून प्रेम संबंध असल्याने ते दोघे ही भेटत होते, बोलत होते, गप्पा मारत होते. ते दोघे नात्याने मावस भाऊ बहिण लागत असल्याने सुरूवातीला कोणाला या प्रेमप्रकरणाची शंका आली नाही. मात्र कालांतराने या दोघांच्या प्रेम संबंधाची कल्पना दोघांच्या ही घरच्या लोकांना आल्यावर ते सावध झाले. समाजाला आणि नात्यातील लोकांना हे रुचणारे नव्हते.म्हणून त्या दोघांना ही त्यांनी समजावून सांगितले. तुम्ही दोघे नात्याने बहिण भाऊ आहात तुमच्यात वेगळे काही घडयला नको असे बजावून सांगितले. त्यातून स्नेहलच्या व दत्तात्रयच्या आईने वेगळाच मार्ग काढायचे ठरविले. त्यातच स्नेहलला घरे येऊ लागल्याने त्यातीलच शामगाव येथील एका मुलाचे स्थळ त्यांना पसंत पडले.तो मुलगा ही सधन आणि चांगला होता. गेल्या तीन चार महिन्यापूर्वी स्नेहलचे त्या मुलाशी त्यांनी लग्न लावून दिले. लग्नानंतर ती शामगाव येथे नवऱ्याबरोबर राहू लागली. इकडे मात्र दत्तात्रयची अवस्था खूपच वाईट झाली.तो तिच्या प्रेमात वेडा झाला असल्याने तिने आपल्याला सोडून दुसऱ्याशी लग्न केल्याने तो अस्वस्थ झाला.तिने दुसऱ्या तरूणाशी लग्न केल्याने त्याला ते सहन झाले नाही. तो मनातील मनात झुरत होता. आपले मनापासून तिच्यावर प्रेम असताना तिने आपल्याला का धोका दिला? असे त्याला वाटत होते. खरे तर नात्याचे बंधन झुगारून तिने आपल्या बरोबर यावे असे त्याला वाटत होते. पण समाज रित आडवी येत असल्याने ती ही काही करू शकत नव्हती. नवीन लग्न झाल्यावर ती मात्र खुश असल्याचे त्याला दिसत होते. त्यातच तिला दिवस ही गेल्याचे व ती दोन महिन्याची गर्भवती असल्याचे त्याला समजल्यावर तिने आपल्याला मामा केला आहे हे बघून तो नैराश्येच्या गर्तेत गेला. तो रात्र आणि दिवस कुडत होता, झुरत होता. त्याच्या मनात तिच्याविषयी कमालीचा राग आणि द्वेष निर्माण झाला. ती आपली झाली नाही तर तिला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायची नाही असा त्याने विचार केला. आपल्या जीवनात ती नाही तर काही नाही असे त्याला वाटू लागले. तिचे ज्या तरूणाबरोबर लग्न झाले होते. तो तरूण ही त्याच्या नात्यातीलच असल्याने आपल्याला सोडून तिने त्याच्याशी लग्न केल्याने तो खुपच अस्वस्थ झाला ...पान २ वर

## अपमान होताच सुडाचे भूत मानेवर बसले छेडछाड करणाऱ्याने विवाहितेचे कुंकू पुसले



मयत मारूती

बेळगावी (खानापूर)/क्राईम रिपोर्टर

विवाहित महिलेची छेडछाड करणे कधीही प्राणावर बेतू शकते. जर ती महिला चालू असेल तर छेडछाड करणाऱ्याला स्वतःहून लागू होईल, पण ती चांगली खांन्दानी असेल तर तिची छेड काढणाऱ्यांची खैर नाही. पण कधी कधी अशा वादात एखाद्या निरपराध माणसाचा जीव जातो. बेळगाव नजीकच्या खानापूरमध्ये अशीच एक घटना घडली. गल्लीतील एका विवाहितेची त्याच गल्लीत राहणारा एक इसम छेड काढायचा हि बाब तिने तिच्या पतीला सांगितली, त्यावरून तिच्या पतीबरोबर त्याचा वाद झाला, त्यातून हाणामारी झाली आणि एके दिवशी संधी साधून त्याने तिच्या पतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



खानापूर शहरातील बाहेर गल्लीतील आश्रय कॉलनीत मारूती उर्फ कृष्णा गणुराव जाधव हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याच्या गल्लीत जवळच प्रशांत दत्तात्रय नार्वेकर हे राहयला आहेत. मारूती याची बायको रूपाली (काल्पनिक नांव) ही दिसायला देखणी आणि सुंदर असून तशी ती बोलक्या स्वाभावाची आहे. कोणाच्या ही नजरेत भरणारी तिची जवानी असल्याने बघणारा नेहमी तिच्याकडेच एकटक बघत असतो. तशी ती बघणाऱ्याला चालू वाटत असल्याने तिच्याशी बोलण्याचा जवळीक साधण्याचा अनेकजण प्रयत्न करीत असतात. प्रशांतला देखील तसेच वाटत होते. तो रूपालीच्या जास्ती जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न करीत होता. वाटेत ती कधी तरी भेटली तर काय वहिनी म्हणून तो तिला बोलवित होता. तो गल्लीतील असल्याने सुरूवातीला रूपाली ही तो बोलविला की थांबत होती. त्याच्याशी मनमोकळे पणाने बोलत होती. याचा नेमका अर्थ त्याने काढला होता.त्याला वाटत होते की रूपाली त्याला लाईन देत आहे. त्यामुळे त्याच्या मनात तिच्या विषयी प्रेम निर्माण झाले. त्याला ती आवडू लागल्याने त्याच्या मनात वेगळेच वातावरण निर्माण झाले होते. कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेऊन कुस्करतो असे त्याला झाले. त्यामुळे तो तिच्याकडे त्या नजरेने पाहून तिला कामुक इशारे करीत होता. ...पान २ वर

## कोवळ्या कळीचे जीवन अल्पायुषी ठरले दहा वर्षांच्या मुलीला शेजाऱ्याने ठार मारले

कासा/क्राईम रिपोर्टर

सुडाची भावना माणसाला आयुष्यातून उठवते. कारण एखाद्याच्या मनात दुसऱ्या विषयी राग असला कि त्याचे मन त्याला स्वस्थ बसू देत नाही आणि मग त्यातूनच त्याच्या डोक्यात भयंकर विचार फेर धरू लागतात. ज्याच्यावर राग आहे तो तावडीत सापडत नसेल तर त्याच्या कुटुंबातील दुसऱ्या कोणावर तरी सूड घेण्याची त्याच्या मनाची तयारी झालेली असते. अशाच एका घटनेत तलासरी नजीकच्या डोंगारी गावात शेजाऱ्याशी असलेल्या वादातून सूड घेण्यासाठी एका इसमाने शेजाऱ्याच्या १२ वर्षांच्या शाळकरी मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार आणि नंतर तिची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी तलासरी पोलिसांनी मोठ्या कौशल्याने तपास करून अवघ्या २ तासात आरोपीला अटक केली.







तलासरी तालुक्यात डोंगारी गाव आहे. याच गावातून एक १२ वर्षाची शाळकरी १/३/२०२३ रोजी शाळेत गेली ती परतलीच नाही. त्यानंतर तिच्या पालकांनी सर्वत्र शोधाशोध केली, पण मुलगी कुठेच आढळली नाही. त्यामुळे मुलगी बेपत्ता झाल्याची तलासरी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवण्यात आली. प्रकरण गंभीर असल्याने पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालासारीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वसावे यांनी आपल्या सहकार्याच्या मदतीने तपासाला सुरुवात केली. त्यासाठी पोलिसांची चार पथके तयार करण्यात आली. मात्र कोणताही पुरावा नसताना तांत्रिक पुराव्याच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून अवघ्या २ तासात संशयित रमेश दुबळा (४५) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली देताना आपणच त्या मुलीला गुजरातला नेऊन तिच्यावर अतिप्रसंग करून नंतर तिची गळा दाबून हत्या केल्याचे काबुल केले. या प्रकरणी आरोपीवर कलम ३७६ ...पान ६ वर

## संशयामुळे रक्ताचे नाते कलंकित झाले भावानेच सख्ख्या भावाला ठार केले



मयत रोहित

उल्हासनगर/किरण तेलगोटे

संशय खूप वाईट असतो. कारण संशयामुळे माणूस कुठल्याही थराला जातो. अगदी त्याला रक्ताच्या नात्याचीही परवा नसते. कारण संशयातून मनात सुडाची भावना निर्माण होते आणि सुडाने पेटलेल्या माणसाचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही, अशावेळी त्याच्या हातून काहीही घडू शकते. उल्हासनगरात अशाच एका घटनेत मोठ्या भावाचे आपल्या पत्नीसोबत अनैतिक संबंध आहेत असा लहान भावाला संशय होता आणि याच संशयातून त्याने मोठ्या भावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



आरोपी अमित

केवळ संशयाच्या एका कारणावरून एकाच आईच्या उधरातुन जन्म घेतलेले दोन सख्खे भाऊ पक्के वैरी झाले. भावाच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून आजी समोरच भावाचा मूळदा पडला. यामुळे सख्या भावांचे नाते रक्तरंजीत झाले. उल्हासनगर येथे पत्नीशी असलेल्या अनैतिक संबंधाच्या संशयातून लहान भावाने आपल्या मोठ्या भावाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.









पत्नीचे आपल्या मोठ्या भावाशी असलेल्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून लहान भावाने आपल्या मोठ्या भावाचा खून केल्याची धक्कादायक घटना उल्हासनगर येथील शहाड भागातील कॅम्प एक येथील शहाड फाटक जवळ असलेल्या शाहु महाराज कॉलनीत घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अमित रमेश गांगुर्डे आणि रोहित रमेश गांगुर्डे हे दोघे भाऊ अंबरनाथच्या ऑर्डनन्स फॅक्टरीजवळच्या परिसरात राहत होते. दोन्ही भावांची आजी ही उल्हासनगर परिसरात राहते. रोहितचा ११ वर्षांपूर्वी विवाह झाला होता. रोहितला ८ वर्षांची मुलगी असून, लहान भाऊ अमितचा ...पान ६ वर

## लिफ्ट देणाऱ्यांशी दारूसाठी वाद घातला दोन मुलांनीच दारुड्याचा जीव घेतला



मयत ऋषीकेश

नाशिक/क्राईम रिपोर्टर

आज काल कुणाला मदत करण्याची सोय राहिलेली नाही. कारण ज्याला मदत केली तो कधी उलट फिरेल याचा नेम नाही. नाशिक जवळ अशाच एका घटनेत दोन तरुण मुलांनी एका दारुड्याला लिफ्ट देताना त्याला आपल्या बाईकवरू ट्रिपल सीट तो राहत असलेल्या ठिकाणी सोडले. मात्र त्या मुलांचे उपकार मानण्याऐवजी तो दारुडा त्यांच्याकडे दारूसाठी पैसे मागू लागला आणि त्यांनी पैसे दिले नाहीत म्हणून त्यांना शिव्या घालू लागला. त्यामुळे चिडलेल्या त्या दोन मुलांनी अत्यंत निर्घुणपणे त्या दारुड्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील धर्माजी कॉलनी, सातपूर परिसरात ऋषीकेश दिनकर भालेराव हा अवघा १९ वर्षाचा तरूण रहात होता. परिस्थिती हलाखीची आणि शिक्षणाची गोडी कमी त्यामुळे शिकून शहाणे होण्यापेक्षा काम करून चैनीत रहाण्याकडे तरूणाईचा कल वाढू लागला आहे. ऋषीकेश त्यापैकीच एक होता. लहान वयातच तो काम करू लागला होता. आता तो एका कंपनीत कंत्राटी कामगार म्हणून कामास होता. हातात पैसा येत होता, त्यामुळे त्याला चैनीची सवय लागली होती. चैनी म्हणजे व्यसन असेच समीकरण बनले आहे. कोवळे वय आणि हातात पैसा आल्याने ऋषीकेशला दारूसह अनेक व्यसने लागली होती. तो बहुतेकदा दारूच्या नशेतच असायचा. दारूच्या इतका आहारी गेला होती की दारूशिवाय दुसरे काही त्याला सुचतच नव्हते. तो दिवस ऋषीकेशच्या आयुष्यात काळ बनूनच आला होता. तो दारूच्या नशेत निघाला होता, ...पान २ वर

## दारुड्या पतीमुळे तिने दुसऱ्याला जवळ केले लफडे उघडकीस येताच होत्याचे नव्हते झाले



मयत सिध्दाप्पा

विटा/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही विवाहितेला संसारात पतीकडून सुख मिळाले नाही कि मग ती दुसऱ्याच्या नादी लागते आणि हि गोष्ट जेंव्हा पतीला समाजते तेंव्हा मग दोघांमध्ये वाद सुरु होतात. कर्नाटकातून विटा येथे मोलमजुरीसाठी आलेल्या सिध्दाप्पाची पत्नीही मजुरी करायची. मात्र सिद्धाप्पाला दारूचे व्यसन असल्याने तो तिच्या गरजा भागवत नव्हता. म्हणून ती दुसऱ्याच्या नाद लागली आणि हे कळल्यापासून सिद्धाप्पा रोज तिला मारहाण करू लागला आणि एके दिवशी दारूच्या नशेत त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

महाराष्ट्रात कर्नाटकातून येऊन मोलमजुरी करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. सीमावर्ती भागातील अनेक बेरोजगार लोक आपआपल्या बाडबिस्ताऱ्यासह महाराष्ट्रात येत असतात. कर्नाटकातील विजापुर जिल्हयातील शेशुंगी तालुका बबलेश्वर येथील सिध्दाप्पा भिमाप्पा शिवगौंडा हा आपली पत्नी भाग्यश्री आणि तीन लहान मुलासह विटा शहरात मोलमजुरीसाठी गेल्या काही वर्षापुर्वी आला. येथे येवून तो आणि त्याची ...पान २ वर

## चंचल विवाहितेने प्लान केला होता मोठा प्रियकराच्या मदतीने पतीचा काढला काटा

हिंगोली/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधाच्या चक्रव्युहात अडकलेली बाई कशाचाही विचार करीत नाही. अशा बाईला आपल्या अनैतिक संबंधात पतीचा अडसर वाटू लागतो आणि मग ती मागचा पुढचा जराही विचार न करता प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढते. हिंगोलीच्या कलमोनुरी येथील अशाच एका घटनेत एका विवाहितेने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढला. मात्र पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.





हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापुर येथे शेख शकील यांच्या खून खटल्यात आता रंगतदार वळण आलं असून आणखी दोघांचा खुनात सहभाग असल्याचा जबाब आरोपीने दिला आहे. जुन्या व्हिडिओने गुन्हेगाराची आणि गुन्ह्याच्या क्रूरतेची ओळख पटवून दिली आहे. खुनाच्या गुन्ह्यात वापरलेली कार आणि डोक्यात घातलेले लोखंडी हत्यार पोलिसांनी जप्त केले आहे. आखाडा बाळापूर येथील शेख शकील शेख खाजा यांचा खून १ मार्च रोजी रात्री झाला होता. यानंतर मयताच्या बहिणीने तक्रार दिल्यानंतर मयताची पत्नी फुलमां शेख, व तिचा प्रियकर मोहसीन खान हरून खान पठाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी दोघांनाही ...पान ६ वर

06 TO 12 MARCH 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/4/2023 8:39 PM Page 1



पान १ वरून...

## शुल्लक कारणावरून चिडला...

प्रयत्न चालवला होता, पण पोलिसांना कोणी तरी खबर दिली आणि पोलीस हजर झाले, त्यानंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातील सेलु या गावात भाऊराव पांडुरग कबले (वय ४२) हे कुटुंबियांसह राहतात. भाऊराव व त्यांच्या अल्पवयीन मुलामध्ये किरकोळ कारणावरून वाद सुरु झाला होता. यामध्ये त्यांच्या आईने मध्यस्थी केली होती. त्यानंतर रात्री भाऊराव बाजेवर झोपण्याच्या तयारीत असताना त्यांनी मुलास रागावण्यास सुरवात केली. वडिल रागावत असल्याने संतापलेल्या मुलाने हाताच कुऱ्हाड घेऊन बाजेवर असलेल्या वडिलांच्या मानेवर कुऱ्हाडीचा वार केला. यामध्ये भाऊराव यांचा मृत्यू झाला. अशी माहिती पोलिसांनी दिली. घरी पत्नी, तीन मुले असा परिवार असून, उदरनिर्वाहासाठी शेती नसल्याने कबले दांपत्य रोज मजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवते. घडलेल्या प्रकारामुळे कबले कुटुंबीय चांगलेच हादरून गेले. मात्र घडलेल्या प्रकाराची कुठेही चर्चा न करता त्यांनी रात्र जागून काढली. त्यानंतर आज पहाटेच भाऊराव यांच्या अंत्यसंस्काराची तयारी सुरु केली. मात्र या घटनेची माहिती मिळताच कुरुंदा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन मोरे, जमादार तुकाराम आम्ले, बालाजी जोगदंड यांच्या पथकाने सकाळी सहा वाजताच सेलु येथे जाऊन मृत भाऊराव यांचे घर गाठले. पोलिसांनी पाहताच घरातील मंडळीना घाम फुटला. पोलिसांनी सर्वांचीच चौकशी सुरु केली. त्यामध्ये मुलानेच वडिलांच्या मानेवर कुऱ्हाडीने वार करून खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी पुढील कारवाई सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## अपमान होताच सुडाचे भूत...

त्याच्या मनातील रूपालीने ओळखले असल्याने अलिकडे ती त्याच्याशी बोलत नव्हती किंवा त्याला जास्त भाव ही देत नव्हती. तो मात्र मुद्दामच तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. ती कुठे ही बाहेर गेली की तो तिचा पाठलाग ही करीत होता. पाठलाग करीत असताना तो मुद्दामच तिच्याकडे बघून कामुक इशारे करीत होता. त्याच्या या त्रासाला छेडछाडीला ती कंटाळली होती. तिला काय करावे काय नको असे झाले होते. तिला ही संसार होता. नवरा बेळगाव बाहेर कामाला असल्याने तो सकाळी कामावर गेला की रात्री उशिराच परत येत होता. तिचा नवरा आणि प्रशांतची मैत्री होती. परंतु ही मैत्री घरच्या बाहेर होती. त्याला माहित नव्हते की प्रशांतच्या मागे लागला आहे. तो तिची छेडछाड करीत असतो तिच्याकडे बघून कामुक हालचाल करीत असतो हे त्याला माहित नव्हते. वाटेत कधी काय भेटले की हाय हॅलो पुरती त्याची ओळख मैत्री होती. गेल्या काही महिन्यापूर्वीच मारूतीला प्रशांत हा आपल्या बायकोची छेडछाड काढत असल्याचे समजले होते. त्यामुळे तो त्याच्यापासून लांबच राहत होता. तो बोलला किंवा भेटला तरी तो त्याला टाळत होता. एकाच गल्लीत राहत असल्याने कुठे भांडणे नकोत किंवा कुणाशी वैर नको या भावनेने मारूती राहत होता.याचा वेगळाच अर्थ प्रशांतने काढला होता. त्याला वाटत होते की मारूती आपल्याला घाबरत आहे. त्याचेत आपल्याला विचारण्याचे धाडस नाही म्हणून तो गप्प बसला आहे. एव्हाना प्रशांत हा मारूतीच्या बायकोच्या मागे लागला असल्याचे आश्रय गल्लीतील अनेकांना माहित होते. तर याच्या ही पलिकडे मारूतीची बायको आपल्याला लाईन देत आहे ती आपल्याला लागली आहे असे प्रशांतने आपल्या जवळच्या मित्रांना सांगून तिची बदनामी केली होती. आपल्या बायकोची बदनामी प्रशांत हा करीत आहे याची कुणकुण मारूतीला लागलेली होती.तो त्याचेवर चिडून होता. याचा जाब प्रशांतला विचारायचा असे मारूतीने ठरविले होते. गेल्या वर्षभरापासून प्रशांत त्याच्या बायकोच्या मागे लागला होता. यातून त्याची दोन तीन वेळा भांडणे ही झाली होती. त्या अगोदर रूपालीने ही प्रशांतला चप्पलेचा प्रसाद दिला होता. त्यामुळे प्रशांतला ही काही ही करून तिला आपल्या अंगाखाली घेवून कुस्करायचेच असे त्याने ठरविले होते. कुणाकडून तरी त्याने तिचा मोबाईल नंबर मिळविलेला होता. तिच्या व्हॉटसॲपवर ही त्याने अश्लिल मेसेज टाकला होता. त्यामुळे रूपालीने त्याचा नंबर ब्लॉक करून टाकला होता. त्याच्या या त्रासाला नवरा बायको दोघे ही कंटाळलेले होते. आपण गप्प राहिलो तरी तो जास्त करतो म्हणून मारूतीने अगोदर आपल्या मित्रांना घेऊन त्यालासमज देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी ही उलट प्रशांतने तुझी बायकोच मला लाईन देते तु काय करणार आहेस असे म्हणून प्रतिप्रश्न करून त्यालाच उलट उत्तर दिले होते. म्हशून नवरा बायकोने त्याच्या विरोधात पोलीसात तक्रार दिली होती.त्यावेळी पोलीसांनी त्याला समजावून सांगून सोडून दिले होते. याचा परिणाम उलटाच झाला. प्रशांत हा रूपालीला जास्तच त्रास देवू लागला होता.त्यामुळे मारूतीचे ही डोके ठिकाणावर राहिले नाही.त्याच्या डोक्यात प्रशांतला अद्दल घडवायची असा त्याने विचार केला. या अगोदर ही त्या दोघांची भांडणे मारामारी झाली होती. यात मारूतीची काहीच चूक नव्हती. तरी ही गल्लीतील काही लोक मारूतीला तुझी बायकोच चालू आहे तू तिला घरात कोंडून ठेव असे सांगून प्रशांतची बाजू घेत होते. मात्र प्रशांत विषयी मारूतीच्या मनात चिड होती. त्याच्यामुळे गल्लीत समाजात मारूतीची आणि रूपालीची बदनामी होत होती. प्रशांतला समज देवून ही तो काही ऐकत नाही हे त्याला ही माहित होते. प्रशांत ही मारूतीचा राग आलेला होता.तो आपल्याला समज देणारा कोण? यात त्याच्या बायकोची ही चूक आहे ती सुरूवातीला आपल्याला लाईन देत होती.आता मात्र मारूतीच्या सांगण्यावरून ती आपल्याला टाळत आहे असे त्याला वाटत होते. रविवार दि.३० ऑक्टोंबर रोजी रात्री ९ ते १०च्या दरम्यान मारूती हा गल्लीतून शतपावली करीत होता. त्यावेळी नेमका प्रशांत हा त्याचे समोर आला. अगोदरच्या भांडणाचा राग त्याच्या मनात असल्याने व मारूतीने चार चौघात त्याला समज दिल्याने तो ही त्याचेवर चिडून होता. मारूती हा शतपावली करीत असताना प्रशांतने त्याचेवर मागून काठीने हल्ला केला. त्याने काठीने त्याच्या डोक्यात जोरात हाणले. तसा मारूती हा खाली पडला. तो ओरडत खाली पडल्यावर प्रशांतने आपल्याकडील चाकू त्याचे पोटात चाकू खुपसला.तो ओरडत खाली पडला. त्याच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्ताची धार लागली. तरी ही प्रशांत हा शांत झाला नाही. त्याने तोच चाकू त्याच्या कपाळावर गळ्यावर मानेवर वार केले. त्यासरशी तो जागीच मयत झाला. आपल्या हातून मारूतीचा खून झाला आहे हे लक्षात येताच तो भानावर आला. हे प्रकरण आपल्या अंगावर शेकणार हे त्याने ओळखले. आपल्या बचावासाठी त्याने वेगळाच प्लॅन केला. कुणाच्या ही काही लक्षात येण्या अगोदर त्याने आपल्या घरातून कुऱ्हाड व तलवार आणली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मारूतीच्या एका हाता जवळ कुऱ्हाड तर दुसऱ्या हाताजवळ तलवार ठेवली जेणे करून भांडणात मारूतीने आपल्यावर पहिल्यादा हल्ला केला आहे. त्याला प्रतिउत्तर देताना आपल्या हातून त्याचा खून झाला आहे असे भासविण्याचां त्याने प्रयत्न केला.काही वेळातच ही घटना आश्रय कॉलनीतील लोकांना समजल्यावर त्यांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनास्थळावर काही अंतरावर प्रशांत नार्वेकर हा हाताशपणे आपल्या हातात चाकू घेऊन बसला होता. त्यामुळे ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली आहे याची चर्चा घटनास्थळावर दबक्या आवाजात होत होती. मयत मारूतीची बायको रूपाली हिने घटनास्थळी येवून आराडा ओरडा करून प्रशांतच्या नावे बोंब ठोकली होती. या घटनेची माहिती खानापूर पोलीसांना कुणी तरी दिल्यावर घटनास्थळी पोलीस ही दाखल झाले. पोलीस निरी.सुरेश शिंगी यांनी भेट देत घटनेची माहिती घेतली.रात्री २ च्या दरम्यान बैलहोंगल विभागाचे डीएसपी शिवानंत कटगी यांनी ही भेट देवून घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या सुचना दिल्या. पोलीसांनी ही घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबला पाचारण केले. घटनास्थळी संशयीत आरोपी प्रशांत नार्वेकर हा हाताश पणे बसला होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने कोणत्या कारणातून ही घटना केली याची माहिती पोलीसांना दिली. घटनास्थळी त्याने केलेला बनाव पोलीसांच्या तपासात उघड झाला.त्यानेच पोलीसांना माहिती देताना सांगितले की,मारूतीचा खून मी त्याच्या बायकोसाठी केला आहे. मागे दोन तीन वेळा त्याच्या बायकोसाठी आमची भांडणे झाली होती. मी त्याच्या बायकोवर लाईन मारत होता. परंतु ती मला हाताला लागत नव्हती. मी त्याच्या बायकोची छेडछाड काढत असल्याने त्याची व आपली पूर्वी भांडणे झाली. त्यानेच पहिल्यांदा आपल्यावर हल्ला केल्याचा बनाव केला आहे हे दाखविण्यासाठी मी त्याच्या एका हाताच्या बाजुला कुऱ्हाड व दुसऱ्या हाताच्या बाजुला तलवार ठेवले होते अशी कबुली त्याने दिली. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगावच्या शासकीय रुग्णालयात पाठवून दिला.या घटनेची फिर्याद मयत मारूतीच्या बायकोने खानापूर पोलीसात दिल्याने पोलीसांनी मारूती उर्फ कृष्णा गणूराव जाधव (वय ४०) याच्या खून प्रकरणी प्रशांत दत्तात्रय नार्वेकर (वय ३५) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने प्रशांत नार्वेकर याची रवानगी बेळगाव येथील हिडंलगा जेलमध्ये केली. या घटनेचा पुढील तपास खानापूर पोलीस स्टेशनचे पो.निरी. सुरेश शिंगी याच्या मार्गदर्शनाखाली खानापूर पोलीस करीत आहेत. कोणत्या ही पुरूषाला आपल्या बायकोपेक्षा दुसऱ्याची बायको ही आवडत असते. त्यातूनच त्याच्या मनात तिच्या विषयी कामवासना तयार होते. ते तिला आपल्या अंगाखाली घेण्यासाठी तिची छेडछाड काढीत असतात. परंतु बऱ्याच वेळेला त्याची ही छेडछाड त्याच्याच अंगलट येते हेच या घटनेवरून दिसून येते.

## नात्यातील 'लव्ह स्टोरी'ची अखेर...

होता. ये रस्मे, ये कस्मे तोड के, तु चली या चुनरीया ओढ के असे त्याला वाटत होते.पण ती आता दुसऱ्याची झाली आहे हे त्याला पटत नव्हते. तिच्या प्रेमात त्याचा जीव अजुनही ओढत होता. पण ती मात्र नव्या संसारात रममाण झाली होती. तिच्या वेलीवर नवा अंकुर फुलणार होता. त्याच्या स्वप्नात ती रंगत होता. तिने मागचे सगळे विसरले होते. एकदा दोनदा तिने त्याला मागचे सगळे विसरून जा अशी ती त्याला म्हणाली होती.या जगात विसरण्या सारख्या खुप गोष्टी असतील पण आठवणीत ठेवण्या सारखी एकच गोष्ट आहे ती म्हणजे तु असे तो तिला म्हणला होता.खरे तर तो तिच्या प्रेमात आंधळा झाला असल्याने त्याला मागचे काही विसरता येत नव्हते. तिची आठवण झाली की तो खुपच अस्वस्थ होत होता. त्याला काय करावे आणि काय नको असे झाले होते. तो तिच्या मोबाईलवर सारखे फोन ही करीत होता. अलकिडे तर तिने त्याचा नंबर ही ब्लॅक लिस्टला टाकला असल्याने तो आणखीन जास्तच चिडला. काय करावे आणि काय नको अशी त्याच्या मनाची अवस्था झाली होती. त्यातच गेल्या पाच सहा दिवसापूर्वी स्नेहल ही वांझोळी येथे आली. तिचे आणि दत्तात्रयचे घर काही अंतरावर होते. ती वांझोळी येथे आल्यावर तो मनातून खप खुश झाला,तिला भेटायला त्याचा जीव अतुर झाला होता. पण ती मात्र त्याला भेटायचे मुद्दामच टाळत होती. यावर त्याने एक मार्ग काढला. रविवार दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्री त्याने स्नेहलला मला तुझ्याशी काही तरी बोलयाचे आहे असे सांगून त्याने तिला आपल्या घरी बोलावून घेतले.त्यावेळी रात्रीचे आठ नऊ वाजले असतील त्यावेळी दत्तात्रय आणि स्नेहलची आई ही कामानिमित्य बाहेर गेल्या होत्या. नेमकी हिच संधी साधून त्याने स्नेहलला आपल्याल घरी बोलावून घेतले. मागचे झाले गेले विसरून ती त्याला भेटायला आली. त्याने तिला आतील खोलीत नेऊन तु माझ्याशी का लग्न केले नाहीस मला तुझ्याशिवाय जगायचे नाही असे म्हटले. तो तिच्याशी या विषयावर वाद घालू लागला. ती ही त्याची समजुत घालीत होती. पण तो काही ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. त्याच्या मनात वेगळेच काही तरी होते, हे ती ओळखू शकली नाही. ती त्याला म्हणत होती माझे आता लग्न झाले आहे मी दुसऱ्याची आहे शिवाय माझ्या पोटात नवा अंकुर फुलत आहे. ती पोटशी असल्याचे त्याला तिने सांगितल्यावर तो जास्तच तिच्यावर चिडला. त्याला राग अनावर झाला, तु माझी नाहीस तर तुला दुसऱ्या कोणाचीच होऊ देणार नाही असे म्हणत त्याने आपल्याकडील लपवून ठेवलेला कोयता घेतला त्या कोयत्याने त्याने तिच्यावर दहा ते बारा वेळा सपासप वार केले.त्यासरशी ती ओरडत काही पडली.तिच्या शरिरातून मोठया प्रमाणात रक्ताच्या धारा लागल्या.ती रक्ताच्या थारोळ्यात पडली. जागीच तिचा मृत्यू झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे बघून त्याने ही घरातील दोरी घेतली आणि ती पंख्याला लावून आपण गळफास लावून घेतला. त्याचा ही जागीच मृत्यू झाला.काही वेळाने स्नेहलची आणि दतात्रयची या दोघांच्यां बाहेर गेलेल्या आई घराकडे आल्या असता त्याना समोरचे दुश्य बघून त्याची पाचावर धारण बसली. दोघी ही घाबरत ओरडत बाहेर आल्या. त्यावेळी आजुबाजुचे लोक जमा झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला स्नेहलचा मृतदेह बघून बघणाऱ्याचे काळीच चिरत होते.तर पंख्याला लटकलेला दत्तात्रयचा मृतदेह बघून मनाचा थरकाप उडत होता.त्याचे हातात एक चिठ्ठी होती. या घटनेची माहिती कुणी तरी औंध पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी वांझोळी येथे दाखल झाले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश देशमुख, स.पो.नी. दत्तात्रय दराडे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची पोलीसांना माहिती मिळाल्यावर पोलीसांनी दोन्ही मृतदेहाचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी खटाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद शिवाजी विठोबा माळी यांनी औंध पोलीसात दिल्याने स्नेहल वैभव माळी (वय २२) व तिच्या पोटातील बाळाच्या खून प्रकरणी मयत दत्तात्रय सुरेश माळी (वय २७) याचे विरोधात गुन्हा नोंदवून या घटनेचा तपास चालू ठेवला. प्रेमात तिच्याकडून किंवा त्याचेकडून धोका मिळाल्यावर त्या प्रेमाचा अंत हा असाच होत असतो परांरतु नात्यापलीकडील प्रेम म्हणजे जरा अतिशोक्तीच होते. नात्याने बहिण लागणाऱ्या मुलीला लग्नाची मागणी घालणे हे कितपत योग्य याचा दत्तात्रय याने विचार करायला हवा होता परंतु तो स्नेहलच्या प्रेमात आंधळा आणि वेडा झाल्याने तो याचा विचार करू शकला नाही शेवट मात्र या घटनेचा दुर्दैवी व्हावा याची मनाला खंत लागून राहते.एवढेच म्हणावे वाटते.

## लिफ्ट देणाऱ्यांशी दारूसाठी वाद...

दरम्यान त्याला दोन लहान मुले मोटरसायकल घेऊन येतांना दिसली. अलिकडे १६-१७ वर्षाची मुलेही सुसाट मोटरसायकल पळवतात. ना परवाना, ना नियमांची माहिती, ना चालवण्याची भीती, अत्यंत मोकाटपणे मुले वाहने चालवत असतात. त्यातून अनेकदा अपघातही झाले आहेत. या मुलांना आपल्या गाडीवरून कोणाला तरी कोठेतरी नेऊन सोडण्यातही मोठेपणा वाटतो. त्यातच त्यांच्यापेक्षा जरा मोठा असणारा ऋषीकेश लिफ्टसाठी हात करतो म्हटल्यावर ते थांबले. त्या दोघांना तो म्हणाला, मला हमालवाडीकडे पाटाजवळ सोडून द्या. ती मुले तयार झाली. तो दारूच्या नशेत आहे हे माहित असूनही त्यांनी त्याला आपल्या मोटरसायकलवर घेतले आणि ते ट्रिपल सीट सुसाट वेगाने निघाले. काही क्षणातच ते हमालवाडीकडील पाटाजवळ पोहचले. त्या मुलांनी ऋषीकेशला गाडीवरून उतरण्यास सांगितले. तो गाडीवरून उतरला आणि त्या मुलांना म्हणाला, 'मला जरा पैशाची गरज आहे रे. देणार का?' मुलांनी विचारले, 'कशाला पाहिजेत?' 'मला दारू प्यायची 'आहे' असे ऋषीकेशने सांगितले. त्या मुलांनी हात वर केले. आमच्याजवळ एक रूपयाही नाही असे सांगून ते जाऊ लागले. पुढे बसलेला गाडीला किक मारत होता. दरम्यान मागे बसलेल्या मुलाची गळपट्टी ऋषीकेशने धरली. त्याला धमकावत तो दारूसाठी पैसे मागू लागला. त्याला शिवीगाळ करू लागला. एक तर लिफ्ट दिली आणि आता हा दारूसाठी पैसे मागतो, पैसे दिले नाहीत म्हणून शिव्या देतो, हे काही त्या मुलांना सहन झाले नाही. तेही त्याला प्रत्युत्तर देऊ लागले. वाद पेटत गेला. तो दारुच्या नशेत होता. त्यामुळे त्याला धड उभेही रहाता येत नव्हते, तर ती दोन मुले मात्र रागाने बेभान झाली होती. दोघांनी त्याला पकडले आणि बेदम चोप देण्यास सुरूवात केली. त्याला जमिनीवर पाडून चांगलेच तुडवले. इतके करूनही त्यांचा राग शांत झाला नाही, त्यांनी त्याला दगडाने ठेचून खून केला. ती लहान मुले इतकी चिडली होती की त्यांनी ऋषीकेशच्या तोंडाचा दगडाने ठेचून चेंदामेंदा केला, त्यानंतर त्या दोघांनी तिथून पळ काढला. पोलीस अंमलदार घनश्याम लक्ष्मण महाले, हवालदार कलकर्णी, पोलीस नाईक भोईर, कॉन्स्टेबल साबळे, सावळे असे सर्व जण दि. २१ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस वाहनाने गस्त घालत होते, तेंव्हा मखमलाबाद पेठ रोड, लिंक रोडवरील आर. के. होरायझन बिल्डींगसमोरच्या कच्च्या रस्त्यावर पाटालगत त्यांना लोकांची गर्दी दिसली. त्यांनी तेथे धाव घेवून पहाणी केली असता झाडाझुडुपामध्ये निळ्या रंगाची जीन्स व राखाडी रंगाचा शर्ट परिधान केलेल्या एका तरूणाचा मृतदेह जमिनीवर रक्ताने माखलेल्या अवस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्यावर, डाव्या डोळ्यावर, हनुवटीवर व तसेच ओठावर जखमा होत्या, डाव्या बाजूस अंदाजे १ फूट अंतरावर रक्ताने माखलेला एक दगड मिळून आला. त्याची फ्रेंच कट दाढी होती आणि त्याच्या उजव्या हाताच्या मनगटावर हिरवा रंगाचा धागा बांधलेला होता. उजव्या हाताचा अंगठा व तर्जनीच्या मागे इंग्रजीत 'आर' असे गोंदलेले होते. त्याचा उजवा पाय पोलिओसारख्या आजाराने लहान झालेला होता. पोलिसांनी उपस्थित असलेल्या लोकांना त्या तरूणाबाबत विचारपूस केली असता कुणी काहीच माहिती दिली नाही. त्याला कुणीही ओळखत नव्हते. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करुन मृतदेह पोस्टमॉर्टमकामी सामान्य रुग्णालयात रवाना केला. पोलिस अंमलदार घनश्याम महाले यांनी पंचवटी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. गु.र.न. ३५/२३ भा.द.वि. ३०२ नुसार अज्ञात मारेक-याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. दि. २१ जानेवरी २०२३ रोजी सकाळी नऊ वाजण्यापुर्वी मखमलाबाद पेठ रोड लिंक रोडवरील आर. के. होरायझन बिल्डींगसमोर कच्च्या रस्त्यावर पाटालगत अज्ञात तरूणाचा कोणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी कारणाने त्याच्या डाव्या बाजूस डोक्यावर, डाव्या डोळ्यावर, हनुवटीवर तसेच ओठावर दगड मारून त्यास जिवे ठार मारले आहे अशी फिर्याद देण्यात आली. पंचवटी पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सिताराम कोल्हे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक युवराज पत्की आदींनी घटनास्थळी भेट देवून गुन्ह्याची माहिती घेतली. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक पत्की यांच्याकडे देण्यात आला. मयताची ओळख पटवण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिसांनी शहरातील सर्व पोलिस स्टेशनला ही माहिती कळवून मयताची ओळख पटवण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणे सातपुर परिसरातील काही नातलगांनी पोलिस स्टेशनला येवून मयताची ओळख पटवली. आता त्याला मारणारे कोण? हे शोधायचे काम बाकी होते. पोलिसांनी खबरे कामाला लावले. एका खब-याने पोलिसांना खबर दिली. या परिसरात त्या तरुणाला दोन मोटार सायकलस्वारांनी लिफ्ट दिली होती. हि माहिती मिळाल्यानंतर पोलिस यंत्रणा सक्रीय झाली. खबरे आणि तांत्रिक तपास याद्वारे त्या दोघांचा शोध घेतला जात होता, तर ते दोघेही मुंबईला पळून गेले होते. पोलिसांनी त्या मुलांच्या मुंबईतील नातेवाईकांचे पत्ते घेवून पथके मुंबईकडे रवाना झाली. पोलीस त्या मुलांपर्यंत पोहचले. पोलिसांना पहाताच त्या मुलांची बोबडी वळली. पोलिसांसमोर सगळा घटनाक्रम उघड झाला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन नाशिकला आणले. दोन्ही मुले विधीसंघर्षीत असून ही घटना उजेडात येताच खळबळ उडाली. या गुन्ह्याचा पंचवटी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छडा लावला.

## दारुड्या पतीमुळे तिने दुसऱ्याला ...

पत्नी मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करीत होते. सिध्दाप्पा हा प्तनी भाग्यश्रीसह विटा शहरातील जुना वासुंबे रस्त्याच्या तलावाजवळ झोपडी बांधून राहत होता. त्याच्याबरोबर त्याच्या भागातील अनेक कुंटुंबे ही झोपडी करून राहयला आहेत. सिध्दाप्पाची बायको भाग्यश्री ही दिसायला देखणी आणि शिडशिडीत बांध्याची असून ती नेहमी कोणाबरोबर जरी बोलत असली तरी ती त्याचेबरोबर हसत खेळत बोलत असायची. त्यामुळे सिध्दाप्पाच्या मनात तिच्याविषयी वेगळाच विचार येत होता. ती कोणाबरोबर जरी बोलत असली की तो तिच्यावर चिडयाचा तो तिला इतर परपुरुषाबरोबर बोलू देत नव्हता. देखणी बायको दुसऱ्याची असते असे त्याच्या मनात येत होते. भाग्यश्री ही तीन मुलांची आई असली तरी तिची जवानी चार चौघात उठून दिसत होती. तिच्याकडे बघून तिच्या शेजारी राहणारे तरूण लाळ घोळीत होते. अशातच ती कामावरील एका तरूणाच्या नादाला लागली असल्याची माहिती सिध्दाप्पाला मिळाली. तो तरूण ही त्याच्या माघारी तिला भेटत होता. त्या दोघात काय चालले आहे हे झोपडी करून राहणाऱ्या इतर लोकांना कळून चुकले होते. भाग्यश्रीचे त्याच्याबरोबर लफडे आहे सिध्दाप्पा कामावर गेला की तो तरूण तिच्या झोपडीत रात्री अपरात्री शिरत असल्याची माहिती ही शेजारी राहणाऱ्या लोकांना माहित होते. अलकिडे सिध्दाप्पा हा दारू पिऊन ढाराढुर झोपत होता. कामावरून घरी येताना तो फुल्ल दारूच्या नशेत येत होता. भाग्यश्री आणि मुलाकडे त्याचे अजिबात लक्ष नव्हते.तो दारू पिऊन आला की तिला शिव्या देऊन मारहाण करीत असायचा. तिचे कोणाबरोबर तरी लफडे आहे याची त्याला माहिती पडली होती. पण तो तरूण कोण आहे हे त्याला माहित नव्हते. भाग्यश्री ही बाहेरख्यालीपणाने वागून आपल्याला फसवत आहे याची त्याला जाणीव झाली होती. अलिकडे तिच्याकडे एक नवीन मोठा मोबाईल ही आला होता. हा मोबाईल तरी तिने कामाच्या पैशातून घेतला नव्हता की त्याने ही घेऊन दिला नव्हता.मग हा मोबाईल आला कुठून याचा अर्थ त्या तरूणाने तिला तो मोबाईल दिला आहे हे तो ओळखून होता.त्यामुळे तो जास्तच तिच्यावर चिडत होता. भांडणात तिने ही त्याला बऱ्याचवेळेला समजावून सांगितले होते की, माझे कोणाबरोबर कसले ही लफडे नाही,मी त्यातील बाई नाही तुम्ही उगाच माझ्यावर संशय घेऊ नका पण तिच्या सांगण्यावर त्याचा काही विश्वास नव्हता.तिचे बाहेर कोणाबरोबर तरी नक्कीच लफडे आहे याची त्याला खात्री झाली होती. त्याचे आता कामावर ही लक्ष नव्हते. दारू पिण्याकरीता पैसे येतील तेवढेच तो काम करीत होता.त्यामुळे घर खर्च चालविणे आणि मुलांचा खर्च ही भागविणे ही भाग्यश्रीला अवघड झाले होते. नवरा आपल्याकडे आणि आपल्या मुलांच्याकडे लक्ष देत नाही म्हणून ती त्याच्याबरोबर चिकटली होती. तिचा प्रियकर तिला खर्चाला ही पैसे देत असल्याने तिच्या दोन्ही गोष्टी भागत होत्या.पण ती नवऱ्याला आपले कोणाबरोबर कसले ही लफडे नाही असे खोटेच सांगत होते. सिध्दाप्पाला तर तिच्या वागण्याबद्दल शेजाऱ्याकडून आधीच समजले होते. त्यामुळे तो तिच्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत भांडण काढत असायचा. ती बिचारी ही त्याचा मार खाऊन गप्प राहत होती. तिच्या दोन्ही गरजा तिच्या प्रियकराकडून पुर्ण होत असल्याने ती त्याचा मार सहन करीत होती. तिला धड नवऱ्याला ही सोडता येत नव्हते तर प्रियकराला ही सोडता येत नव्हते अशी तिची गत झाली होती. भाग्यश्रीच्या बाहेरख्याली वागण्याने सिध्दाप्पा हा सैरभैर झाला होता.तो कामावर गेला तरी त्याचे कामावर लक्ष लागत नव्हत. आपली बायको आता काय करत असेल ती त्याच्याबरोबर झोपून मजा मारत असेल काय असा घाणेरडा विचार त्याच्या डोक्यात येत होता. दारूच्या नशेत तो तिला मारहाण करताना नको तसल्या घाण घाण शिव्या देत असायचा. त्या दोघांची भांडणे म्हणचे वस्तीवरती तमाशाच झाला होता. इकडे आपण मोलमजुरीसाठी आलो आहोत कशाप्रकारे आपण राहयला पाहिजे याची जाणीव खरे तर त्या दोघांना नव्हती. सकाळी कामावर जायचे, रात्री उशिरा कामावरून परतायचे रात्री दारू पिऊन तिला मारहाण करीत शिव्या दयायचे असले त्याचे जीवन म्हणजे एखाद्या राहट गाडग्यासारखेच होते. त्या दोघांची भांडणे शेजारी राहणाऱ्या त्याच्या भागातील लोकांनी बऱ्याचवेळेला सोडवून सिध्दाप्पाला समज ही दिली होती. पण त्याच्या डोक्यात तिच्या चारित्र्याचा किडा वळवळत असल्याने तो कोणाचेच काही ऐकत नव्हता. गुरूवार दि.२ मार्च रोजी त्या दोघांत कामावर जात असताना भांडण सुरू झाले. तो आधीच फुल्ल दारू पिऊन होता. ती त्यावेळी त्याचेबरोबर कामाला यायला तयार नव्हती याचा त्याला राग आला. तु माझ्याबरोबर कामावर येणार नाहीस तर झोपडीत राहून तु काय त्याच्याबरोबर झोपून मजा मारणार आहेस काय असे तो म्हणाला त्यावर ती रागाने लालबुंद होत तु जा कामावर मला त्याच्याबरोबर राहयचे मी त्याचीच होणार आहे. तुझ्यात काय दम नाही म्हणून तु मला आणि पोराबाळांना उपाशी ठेवतोस असे ती रागाने बोलली तिने त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवल्याने त्याने तिचे केस ओढून तिला खाली पाडले. ती ओरडत होती तो तिला मारहाण करीत होता सांग तुझा यजमान कोण आहे तु कोणाबरोबर मजा मारतेस. मला त्याचे नाव सांग मी त्याला ही आणि तुला ही जिवंत ठेवत नाही म्हणत त्याने बाजुलाच पडलेला लोंखडी फावडा घेतला आणि खाली पडलेल्या भाग्यश्रीच्या डोक्यात जोरात पाच ते सहा वेळा घातला. त्यासरशी तिचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. ती ओरडत असताना काही तरी विपरीत घडले आहे असा अंदाज बांधून बाजुलाच राहणारे झोपडीत राहणारे लोक तिला सोडवायला धावत पळत आले. त्यांनी सिध्दाप्पाला बाजुला करून त्याला मागे ढकलेले. त्याच्या मारहाणीत भाग्यश्री ही गंभीर रित्या जखमी झाली होती.तिला त्यांनी त्याच अवस्थेत जवळच असणाऱ्या खाजगी ओमश्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून तिचा उपचारापुर्वीच मृत्यू झाल्याची माहिती लोकांना दिली. भर दुपारी घडलेल्या घटनेने आजुबाजुचे लोक ही घाबरले होते. या घटनेनंतर सिध्दाप्पा हा कुठे ही पळून गेला नव्हता. उलट तो दारू पिऊन येवून आपल्या झोपडीजवळ दारूच्या नशेत आज मी तिला संपविले. तिचा मी आज बाजारच केला.असे बडबडत बसला होता. या घटनेची एकाने विटा शहर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची माहिती घेऊन घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी विट्यातील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. या घटनेची फिर्याद सिध्दाप्पाच्या शेजारी राहणाऱ्या त्याच्या गावातील सुदीप बन्नटे यांनी विटा शहर पोलीसात दिल्यावर पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपी सिध्दाप्पा शिवगौंडा याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशाकरिता केला याची माहिती पोलीसांना दिली. सदीप बन्नटे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी भाग्यश्री सिध्दाप्पा शिवगौडा (वय ३०) हिच्या खून प्रकरणी तिचा पती सिध्दाप्पा भिमाप्पा शिवगौंडा (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमारे उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लोखंडी फावडा जप्त केला.या घटनेचा पुढील तपास पो.उप.निरी.जे.ए.जाधव हे करीत आहेत. संशयाने मन पोखरले की पती किती बिथरतो आणि त्याचे हातून कोणती घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते. खरे तर भाग्यश्रीचे जवळच राहणाऱ्या एका तरूणाबरोबर लफडे होते. पण ती तसे दाखवून देत नव्हती. त्यातूनच सिध्दाप्पाला तिच्यावर संशय घ्यायला जागा राहली होती. त्या संशयाने पछाडलेला होता. त्यामुळे त्याने तिचा चिडून खून केला.

# राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची-डॉ.दिनेश मौने



**लातूर/प्रतिनिधी**

राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या तरुणांनी देशात परिवर्तन घडविले आहे असे प्रतिपादन लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिनेश मौने यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, भूसणी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी ते ०५ मार्च २०२३ या कालावधीत युवकांचा ध्यास-ग्राम-शहर विकास विशेष युवक वार्षिक शिबिर मौजे भूसणी ता. औसा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर सरपंच वीरभद्र स्वामी, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, उपप्राचार्य प्रा. संजय पवार पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, शिवसांब पाटील, मुख्याध्यापक सुनील हेंगणे, ग्रामसेवक नागनाथ काळे, इंदुमती गायकवाड, जयश्री घोडके, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. संजय गवई, डॉ. टी. घन:शाम, दुग्धशास्त्र विभागातील डॉ. गुणवंत बिरादार आणि माजी विद्यार्थी शुभम स्वामी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. स्वागत गीत कु. शिवाली मुकडे हिने सादर केले. पुढे बोलताना डॉ. दिनेश मौने म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये समाजवाद निर्माण करणारी शासनाची महत्त्वपूर्ण अशी योजना आहे. तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी तयार करून तरुणांना खंडप्राय अशा भारत देशात पसरलेल्या ग्राम जीवनाचे अनुभूती द्यावी त्यांचे प्रश्न त्यांना जाणून घेता यावेत याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या आयोजन करण्यात येत असते. ग्रामस्थ आणि तरुणांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न समस्या सोडून घेण्याचा प्रयत्न केला जातो. राळेगण सिद्धी, हिवरे बाजार आणि चिमाचीवाडी यासारख्या छोट्या छोट्या खेड्यांनी शासनाच्या मदतीने गावामध्ये अमुलाग्र बदल केला आहे. या गावात देखील सात दिवसाच्या युवक शिबिरात उत्तम पद्धतीने कार्य व्हावे आणि इथल्या तरुणांना एक नवी दिशा मिळावी अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी सरपंच वीरभद्र स्वामी, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, मुख्याध्यापक सुनील हेंगणे यांनी आपापले मनोगते व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. संजय गवई यांनी तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रा. शंकर भोसले, संतोष येचवाड, योगेश मोदी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# देवणी शहरात व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची टाकून रोख ९ लाख ५ हजार पळविले; आरोपी विरोधात गुन्हा दाखल

**देवणी/शकील मनियार**




देवणी शहरातील बसस्थानक शेजारी असलेल्या घराकडे जात असताना व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची टाकून हातातील बॅगेत असलेली रोख रक्कम ९ लाख ५ हजार रुपये दोन अज्ञात व्यक्तींनी पळविल्याची धक्कादायक घटना गुरुवार दि.२३ फेब्रुवारी रोजी रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. देवणी शहरातील किराणा दुकानाचे व्यापारी उमाकांत जगदीश जीवणे राहणार देवणी हे नेहमी प्रमाणे रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दुकान बंद करून रोख रक्कमेची बॅग सोबत घेऊन बसस्थानक शेजारी असलेल्या घराकडे जात असताना गुरुवारी रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास गुन्ह्यातील नमूद अनोळखी आरोपींनी संगणमत करून जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने व्यापाऱ्याच्या डोळ्याला दुखापत व इजा करून डोळ्यात लाल मिरचीची पुड टाकून डोळ्याला इजा व जखम करून व्यापाऱ्याच्या हातातील रोख रक्कम ९ लाख ५ हजार रुपये असलेली बॅग जबरीने चोरी करून पळून गेले. या प्रकरणी व्यापारी उमाकांत जगदीश जीवणे राहणार देवणी यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात उशिरा रात्री दिड वाजण्याच्या सुमारास गुन्हा रजिस्टर नंबर ४२/२०२३ कलम ३९२, ३४ भादवी प्रमाणे दोन अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनास्थळी देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांनी भेट दिली असून घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे हे करीत आहेत. दरम्यान या धाडसी व जबरी चोरी प्रकरणातील आरोपीच्या शोधासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गर्शनाखाली तपासाची चक्रे गतिमान करण्यात आली आहेत, नीलंग्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी घटास्थळाला शुक्रवारी स्वत: भेट देऊन पाहणी केली. तसेच तपासासाठी सूचना केल्या. तपासासाठी ३ पथके तयार करण्यात आली आहेत.

# मराठी दिन व विज्ञान दिन सौ यमुना यशवंत निजप हायस्कूल येथे संपन्न!

**पालघर/प्रतिनिधी**



सौ यमुना यशवंत निजप हायस्कूल येथे मराठी दिन व विज्ञान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. २७ व २८ फेब्रुवारी २०२३ रोजी अनुक्रमे मराठी व विज्ञान दिन विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी दोन्ही दिवस विविध कार्यक्रमाची रेलचेल दिसून आले मराठी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यानी मराठी दिनाचे महत्त्व आपल्या भाषणातून विशद केले. कुसुमाग्रजांच्या विविध अजरामर कवितांचे वाचन विद्यार्थ्यांनी आपल्या सुमधुर आवाजात व संगीताच्या साथीने उपस्थितांच्या समोर सादर केले तसेच विद्यार्थ्यांनी विविध मराठी गीतां वरती आपल्या नृत्य अविष्करानी सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विज्ञान दिनाच्या निमित्ताने इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयाशी संबंधित विविध आकृत्यांच्या रांगोळ्या काढून त्या विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिल्या. विज्ञान विषयावरती विविध विज्ञानाची उपकरणे प्रदर्शन रूपात मांडून विद्यार्थ्यांना त्यांची माहिती विज्ञानाचे शिक्षक श्री ससाणे, किरण ठाकूर यांनी दिली. कल्पेश ठेपणे सर यांनी विज्ञान विषयाशी संबंधित चित्रफीत विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या माध्यमातून दाखवून विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची अधिकची माहिती उपलब्ध करून दिली. विज्ञानाचे शिक्षक शिरगावकर सर यांनी विज्ञान विषयाशी संबंधित प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या बुद्धी क्षमतेची परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना प्रश्नमंजुषा स्पर्धेत पुढे जाण्यासाठी त्याचे स्वरूप कसे असते याची ओळख करून दिली.

सदर कार्यक्रम प्रसंगी मराठी दिन व विज्ञान दिन या विषया अंतर्गत पर्यवेक्षक प्रदीप ठाकूर सर व मुख्याध्यापक निरंजन पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाशी संबंधित मार्गदर्शनपर माहिती देऊन विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयाची विषयाशी मैत्री करावी विषयाची भीती मनातून काढून टाकावी व आयुष्यात पुढे जाण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सिद्धार्थ शिरगावकर सर यांनी केले व सूत्रसंचालन समिधा पाटील मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही दिवस विद्यालयाचे शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

# शारदा सेमी इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**



शालेय जीवनातच विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांसह स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन यशस्वी होण्याचा प्रयत्न करावा, पालक व शिक्षकांनी त्यांची तयारी करून घ्यावी. त्याचप्रमाणे संगणकशास्त्राचे परिपूर्ण ज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांनी येथे केले. येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन 'एक टप्पा आऊट' उपविजेता, हास्य कलावंत बालाजी सूळ यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील, सचिव भार्गव पाटील, कोषाध्यक्ष अण्णासाहेब यादव पाटील, नागोराव पाटील, बिभीषण सूर्यवंशी, उध्दवराव निटुरे, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, शारदा इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य डॉ. अभिषेक शर्मा उपस्थित होते. यावेळी डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी आपलाही पाल्य सज्ज असावा, यासाठी त्याला शालेयस्तरावर होत असलेल्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी करून त्याची तयारी पालक व शिक्षकांनी करून घेणे महत्वाचे आहे.

त्याचप्रमाणे आयटी क्षेत्रात सध्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. प्रगत राष्ट्रांप्रमाणे आपल्याही शाळेचे विद्यार्थी संगणशास्त्रातील विविध भाषा शिकणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळेत अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी हास्य कलावंत बालाजी सूळ यांनी विविध राजकीय नेते, अभिनेते यांचे आवाज काढून विद्यार्थ्यांचे मनोरंजन करीत प्रबोधन केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, हिंदी, मराठी गीतांवर नृत्य, गायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिष्यवृत्ती व डॉ. होमी भाभा वैज्ञानिक परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण पुरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहित जाधव व मानसी पाटील यांनी केले. आभार दर्शना देशमुख यांनी मानले.

# काळानुसार बदलत जाऊन सुधारणा करण्याचे काम अनुकरणीय -शिरसाट

**सोलापूर/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुक्यातील जेऊर ग्रामपंचायतीने बदलत्या काळानुसार गावात बसविलेली सिसिटीव्ही यंत्रणा ही काळाची गरज असून हे काम निश्चितच अनुकरणीय असल्याचे मत तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांनी व्यक्त केले. ते जेऊर येथे बसविलेल्या १२ उच्च क्षमतेच्या सिसिटीव्हीच्या लोकार्पण प्रसंगी बोलत होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील हे होते. प्रारंभी प्रतिमा पूजन करून फित कापून सिसिटीव्ही यंत्रणेचा शुभारंभ केला गेला. यावेळी तहसिलदार बाळासाहेब शिरसट पोलीस निरीक्षक महेश स्वामी, प्रशिक्षणार्थी तहसीलदार कांबळे, नागनाथ सुरवसे, उपसरपंच काशीराया काका पाटील, शिवाजी कलमदाणे, अंबाराया कनोजी, काशिनाथ कडगंची, रमाकांत भासगी, सचिन चव्हाण, शिवानिंगप्पा पत्रिगीडा, सुरेश सोनार, सुरेश कोळी आदींची प्रमुख उपस्थिती होती. जेऊर येथील काशिलिंग मंदिर परिसर, मेन रोड, स्टेशन रोड, सोलापूर रोड, ग्रामपंचायत परिसर, बसस्थानक आदी ठिकाणी बऱ्याच सिसिटीव्ही बसविण्यात आले असून आणखी २२ सिसिटीव्ही बसविण्याची क्षमता तयार ठेवण्यात आली आहे. पुढे बोलताना शिरसाट म्हणाले की गावात सिसिटीव्ही बसविल्याने प्रशासनावर असलेला गाव सुरक्षेचा ताण कमी होणार असून गुन्हेगारी कमी होऊन वातावरण चांगले होण्यास मदत होणार आहे. पोलीस निरीक्षक स्वामी म्हणाले की, पूर्वी गावातील बुजुर्ग लोक सिसिटीव्ही सारखेच काम करून गावात सलोखा ठेवायचे पण आता नवी पिढी आली, गरजा बदलल्या तसेच अनेक गोष्टी बदलत गेल्या त्यासोबतच गुन्हेगारी स्वरूप देखील बदलले त्यासाठी सिसिटीव्ही यंत्रणा अतिशय उपयुक्त ठरणार असून जेऊर ग्रामपंचायतीचे काम हे प्रशंसनीय आहे.शेवटी मल्लिकार्जुन पाटील यांनी मनोगत व्यक्त करून सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले.दरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान गावकऱ्यांनी केला. यावेळी इरणा कणमुसे, नागनाथ तळवार, सिद्धाराम कापसे, इरप्पा कोळी, रहिमान अत्तार, भीमाशंकर वग्गे, सुनील जाधव, उमाकांत राठोड, काशिनाथ कळवंत, प्रकाश ननवरे, गंगाधर इरशेट्टी यांच्यासह ग्रामपंचायत व सोसायटी सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन शंकर अजगोंडा यांनी केले तर आभार तुकाराम दुपारगुडे यांनी मानले.

# गावठी दारू हातभट्ट्यांवर तालुका पोलिसांची कारवाई

**भिवंडी/प्रतिनिधी**

गावठी दारू विक्री बंदी असतानाही भिवंडीतील ग्रामीण भागात गावठी हातभट्टी दारू मोठ्या प्रमाणात बनवली जात असल्याची गुप्त माहिती तालुका पोलिसांना मिळतात भिवंडी तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोराटे व सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने वडूनवघर गावच्या हद्दीतील फिरींगपाडा खाडी किनारी झाडा झुडपात असलेल्या दोन गावठी दारू हातभट्ट्यांवर कारवाई करीत सुमारे १५० लिटर गावठी दारुसह काळा गूळ, नवसागर व इतर रसायन सह गावठी दारू हातभट्ट्या उध्वस्त करत दोन्ही ठिकाणाहून सुमारे ७० ड्रम गावठी दारूचे रसायन नष्ट केले. असून एकूण १ लाख ९५ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल तालुका पोलिसांनी नष्ट केला आहे.

# कु. रितू प्रविण मंडोरा सी. एस.परिक्षा उत्तीर्ण



जळगाव : जैन इरिगेशनचे वरिष्ठ सहकारी प्रविण मंडोरा यांची कन्या कु. रितू मंडोरा हिने कंपनी सेक्रेटरी सी. एस. या अभ्यासक्रमात पदवी उत्तीर्ण केली. तीन वर्षाच्या अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला ती भारतातून १० व्या रँकने तर जळगाव, धुळे, नंदुरबार, अकोला, बुलढाणा या पाच जिल्ह्यातून पहिल्या रँकने उत्तीर्ण झाली होती. उज्वल स्प्राउटरला १० वी पर्यत त्यानंतर बी. कॉम बाहेती कॉलेज व सध्या एस. एस. मणियार लॉ कॉलेजला एल. एल. बी. च्या द्वितीय वर्षाला रितू मंडोरा शिक्षण घेत आहे. पुढील उच्चशिक्षणासाठी ती पुण्याला जाणार आहे.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर ४०१ ६०३**

web. http://mahatenders.gov.in, email. jawhar.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ५५ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार जिल्हा पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ई-निविदेमधील सर्व अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या करणाऱ्या योग्य त्या वर्गातील पालघर जिल्ह्यातील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंतांकडून खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील ई-निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच ई-निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुंजपाडा रस्त्यावर पाईप डिप बांधणे. ता. विक्रमगड, जि. पालघर | १९,५१,९७२.०० | वर्ग ५-अ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण रु. ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | |
| २. | तलवाडा दोडेपाडा रस्त्यावर पाईप डिप बांधणे. ता. विक्रमगड, जि. पालघर | १९,५९,७०३.०० | र्ग ५-अ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण रु. ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | |
| ३. | गोंदे खुर्द पैकी समर्थनगर येथील बैठक हॉलकडे जाणारा रस्ता सुधारणा करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | २०,३८,७८७.०० | र्ग ५-अ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण रु. ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक : ०१/०३/२०२३ ते दिनांक : ०८/०३/२०२३ पर्यंत**

**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्या) - दिनांक : ०९/०३/२०२३ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : -

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in

२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका/ अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
Toll Free No. 180030702232 E Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मूळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई-निविदा वेळपत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४. सादर केलेल्या निविदा कागदपत्रांची प्रत स्वतंत्र पाकिटात दिनांक : ०८/०३/२०२३ रोजी किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security)चा DD/FDR/BG लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकारांची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व द्वितीय निम्नतम निविदाकारास (L-2) काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. इतर अटी व शर्ती ई-निविदेमध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

७. वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जा.क्र./सा.बां.वि./जव्हार/निविदा/९२६**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
फोन नं. ०२५२०-२२२२३६
दिनांक : २२/०२/२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम, विभाग**
**जव्हार, जि. पालघर**

**विमाका/कोवि/२०२२-२०२३/२८४**

06 TO 12 MARCH 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/4/2023 8:41 PM Page 1



# देशातील जनमताचा सर्वसाधारण कल!

नुकत्याच पार पडलेल्या ईशान्य कडील पूर्वोत्तर राज्यांचा निकाल जाहीर झाला. यात भलेही भाजपचे लोक नागालँड आणि त्रिपुरामध्ये आम्हाला जनमत मिळाले असा ढोल वाजवत असले तरी प्रत्यक्षात परिस्थीती वेगळी आहे. त्रिपुरामध्ये भाजपची सत्ता होती आणि ती राखण्यात भाजपला यश आले हे खरे असले तरी ते भाजपचे निर्भेळ यश आहे असे म्हणता येणार नाही. कारण त्रिपुरामध्ये धर्माच्या नावाखाली संघाच्या लोकांनी तिथल्या आदिवासी पट्ट्यात जे काम केले आहे त्याचा फायदा २०१८ मध्ये आणि आता २०२३ मध्येही भाजपला झाला. त्यात विरोधकांच्या मतांचे सरळ सरळ विभाजन झाले. विरोधकांची मते डावे पक्ष, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसमध्ये विभागली गेली, त्यामुळे भाजपला तिथे ६० पैकी ३३ जागांवर बहुमत मिळाले. या छोट्या राज्यांकडे काँग्रेसने तसेच इतर विरोधी पक्षाने दुर्लक्ष केले. त्यामुळे इथला भाजप विरोधी असलेला आदिवासी आणि ख्रिश्चन समाज यांचा या भागात सामाजिक काम करणाऱ्या संघाच्या लोकांना पाठिंबा मिळाला आणि त्याचा फायदा भाजपला झाला. तर मेघालय मध्ये एनपीपी या स्थानिक पक्षाने भाजपला डोके वर काढू दिले नाही. तिथल्या प्रादेशिक अस्मितेचा दिवा सतत तेवत ठेवला. त्यामुळे मागील वर्षी प्रमाणे यंदाही त्यांना यश मिळाले. आता भाजपचे लोक एनपीपी बरोबर सलगी करून सरकारमध्ये घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण तसे झाले तर आज महाराष्ट्रात जे शिवसेनेचे झाले तेच उद्या मेघालयमध्ये सत्ताधारी एनपीपी पक्षाचे होईल. कारण भाजपला इथे अवघ्या २ जागा मिळाल्या आहेत २ जागा मिळालेल्या पक्षाला आपल्या सोबत सत्तेत घेणे म्हणजे आपल्या हातून आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. कारण प्रादेशिक पक्षांच्या बाबतीत भाजपचा इतिहास खूप वाईट आहे. प्रादेशिक पक्षाचे बोट धरून एखाद्या राज्यात शिरकाव करायचा आणि तिथे आपला जनाधार वाढवून ज्या प्रादेशिक पक्षामुळे त्यांना संधी मिळाली त्यालाच संपवून टाकायचे, हे धोरण राजकारणात खूप घातक असते. अशावेळी प्रादेशिक पक्षाने सावध राहणे खूप गरजेचे असते. जी चूक शिवसेनेने केली जी चूक पूर्वी ममता, जय ललिता, नितीश कुमार आणि पंजाबमध्ये प्रकाशसिंग बादल यांच्या अकाली दलाने केली, ती चूक मेघालयमध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या एनपीपी पक्षाने करू नये. मागील ५ वर्षात त्यांनी त्यांच्या राज्यात चांगले काम केले म्हणून तर लोकांनी पुन्हा त्यांना चांगले यश मिळवून दिले आहे. या यशाचा उपयोग आपली प्रादेशिक अस्मिता आणि पक्षाचे अस्तित्व टीकवण्यासाठी आणि पक्ष वाढवण्यासाठी करावी. रहाता राहिला प्रश्न नागालँडचां तर या छोट्या राज्यात पुन्हा एकदा एनडिपिपि या स्थानिक पक्षाने दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्यामुळं त्यांनी खरे तर स्वतःचे महत्व वाढवण्यासाठी कुणाचीही साथ न घेता स्वतःचे सरकार स्थापन करायला हवे. आज दुर्दैव असे की नागालँडमध्ये सर्वाधिक जागा एनडीपीपि पक्षाला मिळाल्या पण मीडियामध्ये भाजपच्या नावाचा डंका वाजत आहे हे काही बरोबर नाही. हा प्रकार म्हणजे नाच नाचे बंदर ओर माल खाये मदारी अशातला आहे. मात्र या सगळ्याला कारण सुधा तसेच आहे. प्रादेशिक पक्षांना केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपची भीती वाटतेय. जर आपण त्यांच्या विरोधात गेलो तर आपल्या राज्याला केंद्राकडून पुरेसा विकास निधी मिळणार नाही. केंद्राच्या विकास योजनांचा लाभ मिळणार नाही आणि मुख्य म्हणजे आपल्या मागे इडी, सीबीआय, आयकर यासारख्या तपास यंत्रणांचा ससेमिरा लावला जाईल ही भीती प्रादेशिक पक्षांना असते. म्हणून ते भाजपच्या मागे जातात. देशात आजवर हीच परिस्थिती आहे, पण सगळेच काही डरपोक नाहीत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी, तेलंगणात चंद्रशेखर राव, केरळमध्ये डावी आघाडी, जम्मू काश्मीरमध्ये फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती, दिल्ली, पंजामध्ये आप, बिहारमध्ये लालूंची आरजेडी, ओरिसात बिजु पटनायक राजस्थानमध्ये काँग्रेस, तामिळनाडूत डी एम के यांनी कधीच केंद्राच्या धमक्यांना किंवा दबाव नीतीला भीक घातली नाही. म्हणून ते टिकून आहेत. म्हणूनच आता मेघालयमध्ये जनतेने दुसऱ्यांदा एनपीपी पक्षाला कौल दिला आहे तो प्रमाण मानून तिथे स्वतःचे सरकार बनवावे आणि आपली प्रदेशिक अस्मिता टिकवून ठेवावी. आसाम मध्ये आसाम गण संग्राम परिषदेला ती संधी मिळाली होती, पण त्यांना सत्ता टिकवता आली नाही म्हणून तिथे भाजपला भक्कमपणे पाय रोवता आले. पण इतर पूर्वोत्तर राज्यात त्यांना फारसे स्थान नाही हेच या निकालावरून दिसत आहे.

# चालते बोलते ज्ञानपीठ : प्रा.उत्तमराव जाधव सर

माझे प्रेरणास्थान, माझे मार्गदर्शक, ज्यांनी मला बोटाला धरून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले. शैक्षणिक जीवनामध्येही गुरू-शिष्याच्या नात्यापेक्षाही मैत्रभाव कायम ठेऊन शिक्षणाचे बाळकडू देण्याचे काम केले असे माझे ऋषीतुल्य गुरू. स्पर्धेच्या युगातही आपल्या प्रगल्भ ज्ञानाच्या आधारे मला वैचारिकदृष्ट्या वेळोवेळी मार्गदर्शन करणारे चालते बोलते ज्ञानपीठ म्हणजे माझे गुरूवर्य प्रा.उत्तमराव जाधव सर हे होय. शैक्षणिक क्षेत्रातील तीस वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे पुढील आयुष्य सुख-समृध्दीचे जावो. चांगले आरोग्य लाभो, हीच शिवचरणी प्रार्थना.

माझी शैक्षणिक क्षेत्रातील वाटचाल जेमतेम असली तरी माझे अराध्यदैवत वडील ज्येष्ठ साहित्यिक कै.गणपतराव जाधव ऊर्फ बापू हे जयकिसान शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव असल्यामुळे प्रा.उत्तमराव जाधव सर यांचे माझ्यासह माझे मित्र प्रा.अरविंद घोडके उद्योजक अनिल गोयकर यांच्यासह सर्वच मित्राकडेही त्यांचे विशेष लक्ष रहायचे. मी चांगला अभ्यास करून चांगले बनावे, वडिलांचा चांगला नावलौकिक करावा असे त्यांना मनोमन वाटत असे. त्यातच त्यांचा वडीलांसोबतही चांगला सलोखा असल्यामुळे ते मला कायम संस्कारक्षम शिक्षण देत असत. त्यांच्यामुळेच मला शालेय शिक्षणाबरोबरच नवोदय व स्काऊट गाईडचे धडे मिळाले. त्यांचे विद्यार्थ्यांशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंध व शिक्षणामुळे बारावीपर्यंतचे शिक्षण कधी झाले ते कळलेच नाही. पुढील शिक्षणासाठी मला अंबाजोगाई व नांदेडला जावे लागले असले तरी त्यांच्या आणि माझ्यातील गुरू-शिष्याचा सलोखा मात्र कायम राहीला. ते पुर्वीपासूनच अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे काम करीत होते आणि मलाही चार पुस्तके शिकल्यामुळे आपल्या ग्रामीण जीवनातही मी कधी अंधश्रध्दा व कर्मकांडाना स्थान दिले नाही. एखादी अशी घटना घडली की त्यावर विविध दैनिकामध्ये लिखान करीत असे. त्यांनी माझ्यातील ही चूणुक लक्षात घेऊन पत्रकारिता क्षेत्रात करीअर करण्याचा सल्ला दिला आणि त्यांनी त्यावेळी दिलेला सल्ला माझ्या वाटचालीमध्ये लाख मोलाचा ठरला. माझ्या पत्रकारिता क्षेत्रातील वाटचालीला प्रा.उत्तमराव जाधव सरांबरोबरच तत्कालीन मुख्याध्यापक मनोहर कदम, विद्यमान मुख्याध्यापक रमाकांत जाधव यांचेही मार्गदर्शन मिळाले. यामुळे मी पत्रकारिता क्षेत्रातील पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून उपजिल्हाधिकारी अनंत कुंभार सर यांच्या ओळखीमुळे छत्रपती संभाजी नगरसारख्या शहरामध्ये नोकरीचा शोध घेतला. परंतु त्या ठिकाणी म्हणावी तशी संधी मिळाली नाही. दरम्यानच्या कालावधीत विकासगंगा सेवाभावी संस्था व मित्रमंडळाच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत राहिलो. त्या कार्यातूनही सरांचा आनंद द्विगुणीत करण्याचे काम मी केले.



लिखानातील सातत्यामुळे २००७ मध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या दैनिक एकमत या विभागीय दैनिकामध्ये उपसंपादकपदी काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळचे संपादक श्री.शरद कारखानीस, वृत्तसंपादक पांडुरंग कोळगे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. मिळालेल्या संधीचे सोनं करीत दैनिक लोकमत सारख्या दैनिकामध्ये लातूर व छत्रपती संभाजीनगर आवृत्तीसाठी काम करण्याची संधी मिळाली. त्यातही यशस्वीपणे व नीर्भिडवृत्तीने काम केल्यामुळे अनेक पुरस्कारही मला मिळाले. तरीही मिळालेल्या पुरस्कारामुळे उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही. या उक्तीनुसार आजही पत्रकारितेच्या आव्हानात्मक क्षेत्रात सक्रीयपणे काम करीत आहे. माझ्या या वाटचालीमध्ये काही चढउतारही आले, परंतु प्रा.उत्तमराव जाधव सरांच्या मार्गदर्शनामुळे कुठेही खचून न जाता पत्रकारिता क्षेत्रातील माझे काम आजही सक्रीयपणे सुरू आहे. आजही मी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा जनसंपर्क अधिकारी व जननायक वृत्तपत्राचा कार्यकारी संपादक म्हणून कार्यरत आहे. हे सर्व शक्य झाले ते प्रा.उत्तमराव जाधव यांच्यासारख्या गुरूमुळेच. त्यांनी त्यावेळी सांगितले होते. शिकेल तो टिकेल. शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे. जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. हे सर्वकाही परिवर्तन, ज्ञान आणि विकासातच आहे. त्यामुळे त्याची कास सोडू नका असा सल्लाही त्यांनी मला वेळोवेळी दिला. विद्यार्थीप्रिय प्रा.जाधव सर हे मितभाषी, मायाळू, कनवाळू असून त्यांचे सामान्यातील सामान्यमाणूस, विद्यार्थी यांच्याशी आजही आपुलकी आणि जिव्हाळ्याचे संबंध दिसून येत आहेत. त्यांचे आतापर्यंतचे जीवन हे दातृत्व, परोपकार, निस्वार्थ सेवा, गजरवंताना मदत, होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत यासाठीच घालविलेले आहे आणि आजही शिक्षणाच्या लातूर पॅटर्न निर्माण झालेल्या लातूर जिल्ह्यातील पळशी येथे भगतसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यादानाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या सेवेला आज तीस वर्ष पूर्ण होत आहेत. त्यामुळे या चालत्या-बोलल्या ज्ञानपीठास शतायुष्यापेक्षाही जास्त आयुष्य मिळो. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचे पुढील आयुष्य आनंदमय व आरोग्यदायी शुभसेवाभावी जावो, हीच शिवरचणी प्रार्थना.

**बाळासाहेब गणपराव जाधव**
**पत्रकार, संभाजी नगर, लातूर**

## जीडीसी अँड ए व सीएचएम परीक्षेचे गुणपत्र व प्रमाणपत्र घेवून जाण्याचे आवाहन

लातूर : सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयामार्फत जी.डी.सी. अँड ए व सी.एच.एम. २०२२ चा निकाल १८ जानेवारी २०२३ जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेस बसलेल्या परीक्षार्थींनी आपले गुणपत्र व प्रमाणपत्र लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयातून घेवून जावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केले आहे. गुणपत्रक घ्यावयास येताना सोबत ओळखीचा पुरावा घेवून येणे आवश्यक आहे. जी.डी.सी. अँड ए व सी.एच.एम. परीक्षा २०२२ चे गुणपत्र व प्रमाणपत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, शिवाजी चौक, लातूर (०२३८२-२४५१९३) येथे उपलब्ध आहे.

# साठ गुंठे रेशीम शेती; शेतकरी बनला लखपती

## • तीन महिन्यात सुमारे अडीच लाखाचे उत्पन्न • कमी खर्चात अधिक उत्पन्नाची हमी





लातूर जिल्ह्यातील मांजरा खोऱ्यातील माती आणि भौगोलिक हवामान रेशीम शेतीला अत्यंत अनुकूल असल्यामुळे इथे रेशीमला सुगीचे दिवस येऊ शकतात. खरोळा ता. रेणापूर येथील शेतकऱ्यांनी फक्त दीड एकरात तीन महिन्याच्या फक्त एका हंगामात अडीच लाख रुपयाचे उत्पन्न काढले, त्याचा लेखाजोखा..!!

लातूरपासून जवळपास २८ किलोमीटर अंतरावर असलेलं खरोळा हे रेणापूर तालुक्यातील गाव. या गावातील सिद्धेश्वर कागले हे शेतकरी. दीड एकर शेतीतून केवळ तीन महिन्यात सुमारे अडीच लाख उत्पन्न घेण्याची किमया त्यांनी साधली आहे. पारंपारिक शेतीला बगल देवून रेशीम शेतीची कास धरलेल्या सिध्देश्वर कागले यांना रेशीम विकास विभागाचेही मोठी मदत झाली आहे. सिद्धेश्वर कागले यांचे कुटुंब २०१३ पर्यत पारंपारिक शेती करीत होते. गहू, हरभरा, ज्वारी आणि ऊस अशी पिके घेण्यावर भर. मात्र या पिकांसाठी खर्च जास्त आणि उत्पन्न तुलनेने कमी अशी अवस्था. गावातील इतर शेतकऱ्यांचीही हीच अवस्था. त्यातच काही शेतकरी रेशीम शेती करू लागले आणि त्यांना चांगले उत्पन्नही मिळू लागले. सिध्देश्वर कागले यांनीही २०१३ मध्ये आपल्या दोन एकर शेतीमध्ये तुती लागवड करून रेशीम शेतीला सुरुवात केली. तेथूनच त्यांच्या शेतीतील उत्पन्नात वाढ होण्यास सुरुवात झाली. मात्र, दुष्काळ आणि इतर कारणांमुळे त्यांना तुतीची झाडे काढून टाकावी लागली. पण २०२१ मध्ये सिद्धेश्वर कागले यांनी रेशीम विकास कार्यालयाकडे नोंदणी करून पुन्हा आपल्या दीड एकर क्षेत्रावर पुन्हा तुतीची लागवड करून रेशीम शेतीला सुरुवात केली. जून २०२१ पासून त्यांनी आतापर्यंत सहा पिके घेतली आहेत. रेशीम शेतीमधून शेतकऱ्यांना दर तीन महिन्याला एकरी ७० ते ८० हजाराचे उत्पन्न मिळते. गेल्या एक ते दीड वर्षात रेशीम कोषाला चांगला दर मिळाल्याने सिद्धेश्वर कागले यांना एक ते दीड लाख रुपयांचे उत्पन्न मिळत होते.

**तीन महिन्यात दोन लाख ४८ हजारांचे उत्पन्न**

गेल्या महिन्यात म्हणजेच फेब्रुवारी महिन्यातील ९ तारखेला त्यांनी रामनगर (बेंगलोर) येथील रेशीम मार्केटमध्ये विक्री केलेल्या रेशीम कोषांना प्रतिकिलो ७४५ रुपये दर मिळाला आहे. त्यांनी याठिकाणी चांगल्या प्रतीचे सुमारे ३ क्विंटल २२ किलो रेशीम कोष, तसेच डाग असलेले २६ किलो रेशीम कोषाची विक्री केली. त्यापोटी श्री. कागले यांना २ लक्ष ४८ हजार ७४६ रुपयांचा मोबदला मिळाला आहे.

**उत्पन्न खर्च केवळ २५ हजार रुपये**

यापूर्वीच तुती लागवड केलेली आहे. तसेच शेडही उभारलेले असल्याने गेल्या तीन महिन्यात दीड एकरात रेशीम शेतीसाठी केवळ २५ हजार रुपये खर्च आला. यामध्ये मजुरी सात हजार, औषधीचा खर्च तीन हजार रुपये, अंडीबीजासाठी सुमारे चार हजार रुपये आणि वाहतुकीचा एकूण खर्च जवळपास सात ते आठ हजार रुपये खर्च आल्याचे सिद्धेश्वर कागले यांनी सांगितले. रेशीम शेतीमधील मिळणाऱ्या उत्पन्नाविषयी सिद्धेश्वर कागले म्हणतात की, आम्ही वाडवडिलांपासून पारंपारिक शेती करत होती. यामध्ये गहू, हरभरा, ज्वारी आणि ऊस अशी पिके घेतली जात होती. पण त्यामध्ये खर्च जास्त होत असे आणि तुलनेत उत्पन्न कमी मिळायचे. रेशीम शेतीविषयी माहिती मिळाल्यानंतर २०१३ मध्ये एक एकराव रेशीम शेती सुरु केली. पहिल्याच वर्षी एकरात तीन ते साडेतीन लाख रुपये उत्पन्न मिळाले. आता दोन एकरावर रेशीम शेती करत आहे. दर तीन महिन्याला एकदा याप्रमाणे वर्षातून चार वेळा रेशीम उत्पादन होते. दर तीन महिन्याला एकरी सरासरी ७० ते ८० हजार उत्पन्न मिळते. मात्र गेल्या एक-दीड वर्षात रेशीम कोषाला चांगला दर असल्याने दीड ते दोन लाखांपेक्षा अधिक उत्पन्न मिळाले आहे. ऊसापेक्षा कमी खर्च आणि कमी पाण्यात रेशीम शेतीतून अधिक उत्पन्न मिळत आहे. ऊस पिकातून वर्षाल एकरी जास्तीत जास्त एक ते सव्वा लाख रुपये मिळतात. मात्र, रेशीम शेतीतून वर्षाला किमान साडेतीन ते चार लाखाचे उत्पन्न मिळते. दरतीन महिन्यात केवळ वीस दिवस रेशीम कीटकांचा सांभाळ शेतकऱ्याला करावा लागतो, असे श्री. कागले सांगतात.

**रेशीम शेतीसाठी तीन लाख ४२ हजारांचे अनुदान**

रेशीम शेतीसाठी २०द५० फुट आकाराचे किटक संगोपनगृह आवश्यक असून यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. याशिवाय रेशीम किटकास दिवसातून फक्त दोन वेळा फांदी पध्दतीने पाला दिला जातो. त्यामुळे मजुरीच्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होते. शासनाकडून रेशीम शेतीचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला असल्याने शेतकऱ्यांना एक एकरासाठी तीन लाख ४२ हजार ९०० रुपये अनुदान देखील रेशीम विभागाकडून दिले जाते. यासाठी लाभार्थी हा अल्पभूधारक व जॉब कार्डधारक असणे असावा. कृषि विभागाच्या पोकरा योजनेत देखील रेशीम शेतीचा समावेश आहे. त्यामुळे कृषि विभागाकडूनही तुती लागवडीसाठी ३७ हजार ५०० रुपये, किटक संगोपन गृहसाठी एक लाख २६ हजार रुपये आणि किटक संगोपन साहित्यासाठी ५६ हजार २०० रुपये असे एकूण २ लाख २० हजार रुपयेपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. रेशीम इच्छुक शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी केले आहे.

**- तानाजी घोलप, माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# कसब्यात तळतळाट भोवले!

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

शाहू, फुले, आंबेडकर यांचा महाराष्ट्र हा प्रज्ञावांतांचा आहे. इथे जाती धर्माला फारसे स्थान नाही. त्याच बरोबर मतदारांशी जो बेइमानी करेल त्याला मतदार धडा शिकवतात हा आजवरचा इतिहास आहे. शिवसेना सोडून गेलेल्या लोकांचे २०२४ चा विधानसभा निवडणुकीत काय होणार हे वेगळे सांगायची गरज नाही. कारण गद्दरणा इथे माफी नाही हे छत्रपती शिवाजी महाराजांनीच महाराष्ट्राला शिकवले आहे. कसबा आणि चिंचवड मध्ये झालेल्या पोट निवडणुकीत हेच बघायला मिळाले. जो लोकप्रतिनिधी चांगले काम करतो त्याच्या कुटुंबीयांना स्थानिक जनतेची सहानुभूती निश्चितच मिळत असते.

त्यानुसार चिंचवड मध्ये आश्विनिताई जगताप यांना सुधा पोट निवडणुकीत तशीच सहानुभूती मिळाली. तसेच चिंचवड मतदार संघात लक्ष्मनभाऊ जगताप यांचे चांगले काम होते त्यामुळे तिथले मतदार सुरुवाती पासूनच लक्ष्मण जगताप यांच्या पाठीशी होते आणि त्यांच्या मृत्यू नंतर ते अश्विनी जगताप यांच्या पाठीशी राहिले आणि पोट निवडनुकित प्रचंड मतानी निवडून दिले. मग चिंचवडला जो न्याय लावला तो कासब्याला का नाही. स्वर्गीय मुक्ता टिळक यांचे कसबा मतदार संघात जबरदस्त काम होते म्हणून तर दुसऱ्यांदा त्यांना मतदारांनी निवडून दिले. शिवाय पक्षासाठी सुध्दा त्यांनी खूप काम केले. राज्य सभा निवडणुकीच्या मतदानासाठी त्या कॅन्सर सारख्या आजाराने त्रस्त असतानाही आल्या आणि त्यांनी मतदान केले. पक्षावरील निष्ठा आणि मतदारांच्या प्रती असलेली जबाबदारी मुक्ता ताईंनी आजारपणात सुद्धा समर्थपणे पाळली, असे असताना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना डावलून रासने सारख्या भलत्यालाच उमेदवारी दिली. त्यामुळे मुक्ता ताई यांच्यावर प्रेम करणारे लाखो लोक नाराज झाले आणि त्यांनी नागपूरच्या बामणी काव्याला धडा शिकवला. ना खाता, ना वही मोदी कहे वोही सही! अशी भाजपमध्ये एक पद्धत रूढ झालेली आहे. त्यामुळे देशातील राज्या राज्यात मोदी तयार होत आहेत आणि त्यांची पक्षात मनमानी सुरू आहे. महाराष्ट्रातील भाजपामध्ये असाच एक मोदी तयार झाला आहे आणि त्याचा पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्या पेक्षा बाहेरून गद्दारी करून आलेल्या फुटिरांवर अधिक विश्वास आहे आणि याच विश्वासाच्या जोरावर पक्षातील निष्ठावंताची उपेक्षा केली जात आहे. मात्र मुक्ता ताई सारख्या प्रतिभावान महिला नेतृत्वाची त्यांच्या मृत्यू नंतरही झालेली उपेक्षा त्यांच्या कसब्यातील मतदारांसाठी वेदनादायी होती. म्हणून त्यांनी महाराष्ट्र भाजपतील ज्युनियर मोदींना धडा शिकवला आणि तिथे काँग्रेसचे धांगेकर ११ हजाराहून अधिक आघाडी घेऊन विजयी झाले. ज्युनियर मोदींना दिवंगत मुक्ता ताई, त्यांचे कुटुंबीय आणि कसबा मतदार संघातील मतदारांचा तळतळाट भोवला. आता २०२४चा निवडणुकीत सुद्धा असेच चित्र दिसू शकते. कारण महाराष्ट्रात भाजप एकसंघ नाही, जुन्या निष्ठावंत भाजप नेत्यांची ज्युनियर मोदींकडून जितकी उपेक्षा होईल तितके भाजपचे नुकसान होईल.

**- सोनू जाधव (७०२१४७६१५३)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. ०६ मार्च २०२३ ते रविवार दि. १२ मार्च २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी आमदार चषक क्रिकेट स्पर्धा घेणार – ऋषिकेश कराड



**लातूर/प्रतिनिधी**

खेळ केवळ मनोरंजन नाही तर त्यात खूप मोठी संधी असून ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी आमदार चषक क्रिकेट स्पर्धा दर्जेदार आणि व्यापक स्वरूपात घेतल्या जातील असे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी केले. लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील क्रिकेट खेळाडूंसाठी रेणापूर येथील लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी लातूर ग्रामीण भाजपचे अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जिल्हा उपाध्यक्ष सतिश आंबेकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत कातळे, सोशल मीडिया प्रमुख महेश गाडे, भागवत गिते, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अभिजीत मद्दे, महिला आघाडीच्या अनुसया फड, किसान मोर्चाचे शिवमुर्ती उरगुंडे, विस्तारक दिलीप पाटील, रेणापूर शहराध्यक्ष दत्ता सरवदे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, उत्तम चव्हाण, विजय गंभीरे, रमा चव्हाण, सौरभ कराड, अंतराम चव्हाण, संतोष राठोड, लक्ष्मण खलंग्रे आदीची उपस्थिती होती. या क्रिकेट स्पर्धेत १० संघाने भाग घेतला असून १८ मार्च रोजी समारोप होणार आहे. कबड्डी, कुस्ती, क्रिकेट या खेळाबरोबरच प्रत्येक खेळाला न्याय देण्याचा आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेश कराड म्हणाले की, प्रत्येक संघ विजयाच्याच जिद्दीने स्पर्धेत उतरत असतो खेळाडू मैदानात उतरणे हाच त्याचा खरा विजय असतो खेळ ही खूप मोठी संधी आहे या आमदार चषक स्पर्धेतून मोठ्या मैदानावर खेळणारे खेळाडू तयार व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलताना अनिल भिसे, दशरथ सरवदे, अभिषेक आकनगिरे, सतिश आंबेकर, अभिजीत मद्दे यांनी क्रिकेट स्पर्धा म्हणजे तरुणांचा उत्सव असतो ताण तणाव कमी करण्यात खेळाला महत्त्व आहे या स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाव्यात असे सांगून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.प्रारंभी भाऊसाहेब राठोड यांनी प्रास्ताविक केले तर दत्ता सरवदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आणि लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस ऋषिकेश कराड यांनी पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली उपस्थित मान्यवरांचा संयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. उद्घाटनाचा सामना रेणुका रेसिडेन्सी रामवाडी आणि कला स्फूर्ती कामखेडा या दोन संघात अटीतटीचा झाला शेवटच्या बॉलवर षटकार मारून कला स्फूर्ती संघाने विजय संपादन केला विशेष म्हणजे विजयासाठी एका बॉल मध्ये सहा धावा काढणे गरजेचे होते आणि तेच घडले यावेळी एकूणच मैदानावर मोठा जल्लोष झाला. या क्रिकेट स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास ७१ हजार रुपये, द्वितीय येणाऱ्या संघाचे ५१ हजार रुपये, तृतीय येणाऱ्या संघास ४१ आणि चतुर्थ येणाऱ्या संघास ३१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि आमदार चषक देण्यात येणार आहे. या स्पर्धेत स्वर्गीय श्यामदादा प्रतिष्ठान रेणापूर संघमालक शेख रुजू, कलास्फूर्ती कामखेडा-संजय गुडे, रेणुका रेसिडेन्सी रामवाडी-भागवत गिते, प्रगती रेणापूर-मेघराज पाटील, प्रहार वॉरियर्स मोहगाव-विजय खडके, साई टायगर्स पळशी-अमोल कांबळे, सोमेश्र्वर प्रतिष्ठान आनंदवाडी - संगमेश्वर दंडे, नायक प्रतिष्ठान रेणापूर - दयानायक राठोड, सदगुरु दर्जीबोरगाव-सर्जेराव हातोलकर, वीर वॉरियर्स रेणापूर संघमालक गणेश राठोड या संघाने स्पर्धेत सहभाग घेतला.

# पंचशील ट्रस्टचा वधू वर पालक परिचय मेळावा संपन्न



**मुंबई/प्रतिनिधी**

पंचशील ट्रस्टच्या वतीने मुंबईत आयोजित केलेल्या वधू वर पालक परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. परळ येथील सोशल सर्विस लीगच्या हॉलमध्ये २५ मार्च रोजी सायंकाळी हा वधूवर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रथम बौद्धी वृक्षाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध यांच्या परिमाण पुष्पहार घालून दीप प्रज्वलित करण्यात आले आणि या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी समाजातील मृत व्यक्ती तसेच सीमेवर शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली या कार्यक्रमाला १५० हून अधिक लोक उपस्थित होते या मेळाव्याला भन्ते काश्यप, वासुदेव तांबे, प्रमिला तांबे, पंचशील ट्रस्टचे अध्यक्ष संजय खोत्लेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला वैभव कदम कमलेश कदम अमर जाधव, अशोक जाधव, महेंद्र जाधव, आनंद मिठबावकर, सुवर्णा हडकर, हेमा कुधालकर नागेश मिठबावकर, प्रतिमा तांबे, पंकज अणावकर, शीला पवार, महाडिक सर तसेच बौद्ध वधूवर पालक मोठ्या संख्येने हजार होते.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाण मार्फत वाडा शहरात स्वच्छता अभियान



**वाडा/प्रतिनिधी**

ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्रभुषण डॉ. नानासाहेब तथा नारायण धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, अलिबाग जि. रायगड यांच्या मार्फत व पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ ठेवण्यासाठी महा स्वच्छता अभियान हाती घेण्यात आला. या अभियाना अंतर्गत बुधवारी (दि.०१ मार्च) वाडा तालुक्यातील श्रीसदस्यांनी वाडा शहरातील खंडेश्वरी नाका परिसरात सकाळी एकत्र येऊन संपूर्ण वाडा शहरात ग्रूप तयार करून शहरात स्वच्छता केली. यामध्ये त्यांनी शहरातील घाण एकत्र करून ट्रॅक्टर च्या मदतीने ही घाण शहारा बाहेर आसलेल्या डम्पिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावण्यासाठी नेऊन टाकली. डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाण मार्फत गेल्या अनेक वर्षापासून संपूर्ण भारतभर नव्हे तर जगभरात बैठकीच्या माध्यमातून निरूपण देऊन एक आदर्श समाज घडावा यासाठी योगदान चालू आहे. तसेच प्रतिष्ठाण मार्फत रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्ष लागवड व संवर्धन, निर्माल्य संकलन व खत निर्मिती, बंधारे निर्मिती असे अनेक विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असतात. यावेळी नागरिकांनी प्रतिष्ठानच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले.

# चोरटी वृक्षतोड करणाऱ्या दोघांना अटक





**वाडा/प्रतिनिधी**

हरोसाळे गावाच्या जंगलात बुधवारी मोठी तोड होणार असल्याची खात्रीशीर बातमी वनविभागाला मिळाली असता शोधाशोध सुरु असताना वृक्षतोडीची चाहूल लागता पहाटेच्या सुमारास धाड टाकण्यात आली. यावेळी अंधाराचा फायदा घेऊन आरोपी फरार झाले मात्र एका तस्करास पकडण्यात यश आले असून गुरुवारी अन्य एका आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. वाडा शहराच्या जवळ वनविकास महामंडळच्या कम्पार्टमेंट नंबर ५०७ मधे वृक्षतोडीची माहिती वनविभागाला मिळाली. पश्चिम वाडा परीक्षेत्र अधिकारी विकास लेंडे यांच्या मार्गदर्शना खाली वनविभागाची टीम सज्ज झाली. पहाटे चार वाजताच्या सुमारास तोडीच्या ठिकाणी धाड टाकली असता ८ ते १० व्यक्ती अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले मात्र एकाला पाठलाग करुन पकडण्यात यश आले. आरोपींनी तोडलेली वृक्ष व पिकअप टेम्पो असा एकूण पाच लाख रक्कमेचा मुद्देमाल वनविभागानेजप्त केला आहे. नितीन मारुती वाघात, रा. पिंपळसेत ता भिवंडी व लक्ष्मण खरपडे रा. हरसोले अशी दोघा आरोपींची नावे असून त्यांना न्यायालयात हजर केले असता कस्टडी सुनाविण्यात आली आहे. या कारवाईत वनपाल संभाजी पाटील, किशोर भोईर, वनरक्षक अशोक पाटील, सागर देशमुख, गणेश मोहिते, योगेश राऊत, विजय वळवी व वाघमारे सहभागी होते.

# कुंटणखाना चालवणाऱ्या लॉजवर धाड, मॅनेजरसह तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



विजापूर रोड वरील सूर्या लॉजवर कुंटणखाना सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीसांनी लॉजवर धाड टाकत तिघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत शमा इब्राहिम शेख (वय ४३), सागर आनंद पाटील (वय २२), विश्वनाथ बसवराज मठपती (वय ३९) या तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, आरोपी हे ग्राहकांकडून अडीच हजार रुपये घेऊन पीडितेला पाचशे रुपये देत असल्याची माहिती पोलिसांना दिली. विजापूर रोडवरील सूर्या लॉज येथे वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी लॉजवर बनावट ग्राहक पाठवून खात्री झाल्यानंतर छापा टाकला. यात एका पीडितेची सुटका करण्यात आली तर शमा शेख, सागर पाटील, विश्वनाथ मठपती या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलिस निरीक्षक बजरंग साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव बंडगर, अकिला नदाफ, रमादेवी भुजबळ, राजेंद्र बंडगर आदींनी केली.

# देवणी पोलिसांची धडाकेबाज कारवाई; सराईत चोरट्यांना चार दिवसांत मुद्देमालासह अटक

**देवणी/शकील मनियार**



देवणी पोलीस ठाण्यात अगदी तुटपुंजे पोलीस कर्मचारी असतांना योग्य प्रशासकीय नियोजन लावून तालुक्यात कसल्याच प्रकारचा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे हे योग्य प्रशासन चालवीत आहेत, त्यांचा कार्यकाळ आजतागायत अतिशय नेत्रदीपक गेला असून आपल्या कार्यकिर्दीत कसलाच कलंक लागणार नाही याची दक्षता घेऊन पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली चोख कामगीरी बजावत आहे परंतू नुकतेच २३ फेब्रुवारी २०२३ रोजी देवणी शहरात सर्वात मोठी रक्कम चोरीची घटना घडली देवणी येथील कापड व्यापारी उमाकांत जगदीश जीवने हे रोजच्या प्रमाणे रात्री ठीक ९ वाजता दुकान बंद करून बसस्थानका लागत असलेल्या घराकडे दिवसभर कापड व्यवसायातून जमा झालेली रक्कम ९ लाख ५ हजार रुपये घराकडे घेऊन जात असताना बस स्थानकात आडोसा भितींला दबा धरून बसलेले सराईत गुन्हेगार १) आकाश राजकुमार सूर्यवंशी वय २५ वर्ष रा. हनुमान नगर देवणी २) प्रशांत बालाजी सूर्यवंशी वय १९ वर्ष रा. अंबानगर ता.देवणी ३) दिलीप हनुमंत दासरी वय २८ वर्ष रा. हनुमान नगर देवणी यांनी जीवने यांच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकून ही रक्कम पळविली ही देवणी शहरातील सर्वाधिक मोठी रक्कम पळविणारी पहिलीच घटना होती त्याचं दिवशी उमाकांत जीवणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात व्यक्तिविरोधात गुन्हा रजी ४२/२३ कलम ३९२ ३४ भा द वी प्रमाणे दाखल करण्यात आला होता, देवणी पोलीस ठाण्यात कमी कर्मचारी त्यात काही रजेवर काही बारावी च्या परीक्षा केंद्रावर असतांना त्यात देवणीतील सराईत चोराने व्यापाऱ्यांवर डाका घातला पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांच्या पोलीस प्रशासनाला आव्हानचं दिले सदर गुन्हा दाखल करून घेताच त्यांनी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलिस अधीक्षक अजय देवरे व पोलिस उपअधीक्षक दिनेश कोल्हे यांचे मार्गदर्शन घेऊन चोराने दिलेले आव्हान पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांना बेचैन करणारे होते, स्थानिक पोलिस कर्मचारी यांना सोबत घेऊन पी एस आय मुजाहेद शेख, पोहेकॉ विनायक कांबळे, नरेश उस्तुर्गे, श्रीराम आगलावे, अभिजात डोईजोडे, गणेश बुजारे, गोपनीय शाखेचे अक्रम शेख, साजिद शेख यांचे एक विशेष पथक नियुक्त करून या पथकाचे नेतृत्व स्वतः पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे यांनी केले सर्वप्रथम शहरातील मुख्य रस्त्यावरील सी सी टीव्ही फुटेच घेऊन चौकशी चालू केली सदर आरोपीने या चोरी प्रकरणात पलसर दुचाकी वापरल्याचे सी. सी. टीव्ही फुटेच मध्ये धूसरपणे दिसून आले आपल्या गुप्त हेरामार्फत पलसर दुचाकीचा शोध घेतला संबंधित दुचाकीची चौकशी केली असतात या प्रकरणाचा उलघडा झाला अवघ्या चार ते पाच दिवसात पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे व त्यांच्या पथकांनी वरील तिन्ही आरोपीना गजाआड केले आजतागायत त्यांच्या कडून एक पलसर दुचाकी गाडी व ४ लाख २७ हजार रुपये रक्कम हस्तगत केली असल्याचे देवणी पोलिसाकडूनच सांगण्यात आले आहे, या सराईत चोरांना न्यायालयात उभे केले असताना अधिक तपासासाठी त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असल्याचे सांगण्यात आले अनेक प्रसंगाला तोंड देऊन या चोरी प्रकरणाचा तात्काळ छडा लावून जेरबंद केल्यामुळे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे व त्यांच्या पथकाचे विशेषतः सर्व स्थरातून अभिनंदन केले जात आहे.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी उद्योजकांचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधि**

वि. वा शिरवाडकर ऊर्फ कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे अवचित्त्या साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेना व विद्यार्थी सेना वाडा तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २७ फेब्रुवारी) तालुक्यातील मराठी उद्योजकांचा सन्मान करण्यात आला. आदिवासी वारली पुस्तकाचे लेखक व मराठी विषयात पी. एच. डी. प्राप्त केलेले डॉ. किरणकुमार कवठेकर , वाड्यातील मंगलराज ज्वेलर्सचे मालक प्रशांत बोकंद्, प्रफुल बोकंड, ओम साई बोअरवेलचे मालक राहुल पाटील - किरिवली, कू. मयुरेश शरद मनोरे - चाय सेंटर परळी नाका, विकास बळवंत सकटे - दत्तभेळ, मनीषा विजय अगिवले - बंधन साडी सेंटर वाडा, समीर गव्हाळे -साई मोटर्स वाडा, कु. रोहित दशरथ काळे-एच आर फॅशन पाली, हर्षद जाधव-दाद्या सलून वाडा यांचा सत्कार सन्मान मनसे तालुक्याच्या वतीने करण्यात आला. सदर कार्यक्रमास तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे, ज्येष्ठ कार्यकर्ते दीपक ठाकरे, तालुका सचिव जितेश किणी, तालुका सहसचिव मनोज चौधरी, सतीश पाटील, उपतालुकाध्यक्ष रवींद्र जाधव, विभाग अध्यक्ष देवेंद्र काळे, विद्यार्थी सेना उपजिल्हा अध्यक्ष निखिल बागुल, तालुका अध्यक्ष विक्रांत ठाकरे, शहर अध्यक्ष हेमंत जाधव, महिला सेनेच्या तालुका अध्यक्ष उषा मोरे, मंगल निकम, नम्रता भोये, वाडा विभाग अध्यक्ष स्वप्नील मोरे, विजय बोरसे आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

क्राईम Reporter 9890718873
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, जळगाव, सांगलीतील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा

## लातूरमध्ये जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १ मार्च २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १५ मार्च २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर**
**ई-निविदा सूचना क्र. ०४/उविकृअपा/२०२२-२३**

गतिमान पाणलोट अंतर्गत पालघर जिल्ह्यातील पालघर व वसई तालुक्यातील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विविध कामे करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर फोन नं. ०२५२५ २४१९२७ बी-१ प्रपत्रात निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून आमंत्रित करण्यात येत आहेत. सविस्तर माहिती उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात दिनांक ०३/०३/२०२३ नंतर पहावयास व विक्रीसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील या संकेतस्थळावर सर्व शुद्धीपत्रक, दुरुस्त्या सुद्धा उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात पहावयास मिळेल. कामाचे संक्षिप्त वर्णन खालील प्रमाणे :-

| नि.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम (१ टक्के) | निविदा शुल्क | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग | निविदा विक्री सुरू करण्याचा दिनांक व वेळ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे खुबाळे जुभाशेदु - ग.क्र. १ ते ३, मजगी- ग.क्र. १ ते १० व मौजे खुबाळे/हळदपाडा- जुभाशेदु-ग.क्र. ४ ते ८ मजगी - ग.क्र. ११ ते २९ ता. डहाणू, जि. पालघर | ४२१०५२३/- | ४२१०५/- | २५२/- | १५ दिवस | १ ते ९ | ०३/०३/२०२३ ११.०० | ०८/०३/२०२३ १७.०० | १०/०३/२०२३ ११.०० |

एकूण : ४२१०५२३/-

जिमाका/पालघर/जाहि १३०/९९/२०२३ दिनांक : ०२/०३/२०२३

सही/-
उपविभागीय कृषि अधिकारी,
पालघर, जि. पालघर

06 TO 12 MARCH 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 3/4/2023 8:43 PM Page 1



# भाषेमुळे साहित्य, समाज व संस्कृतीचे संवर्धन आणि अभिवृद्धी होते - माजी खासदार डॉ.जनार्दन वाघमारे

**लातूर/प्रतिनिधी**

भाषा ही विनिमयाचे सर्वश्रेष्ठ माध्यम असून भाषेच्या माध्यमातूनच साहित्य, समाज आणि संस्कृतीचे संवर्धन व अभिवृद्धी होत असते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक माजी खासदार तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील भाषाकुल मराठी, इंग्रजी, हिंदी, पाली, संस्कृत यांच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी ला ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित एकदिवसीय सृजनात्मक साहित्य लेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

या एकदिवसीय सृजनात्मक कार्यशाळेत पहिल्या सत्रात बीजभाषक म्हणून श्री. मोहिब कादरी यांनी साहित्याची निर्मिती प्रक्रिया, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर पाली भाषा विभागप्रमुख डॉ. एस. एम. सोनाने यांनी पाली भाषेतील बोधजातक कथा, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अबाजोगाई येथील इंग्रजी भाषेचे डॉ. धनाजी आर्य यांनी कादंबरीचा पोत तर गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय,लातूर येथील डॉ. नयन राजमाने भादुले यांनी कविता स्फुरते कशी या विषयावर व्याख्याने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथआप्पा लोखंडे होते तर मंचावर शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, प्राचार्य डॉ. दिनेश मौने,खटउ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. श्रद्धा मिसर, प्रा. टी. एम. बिचकाटे आदी मान्यवर विराजमान होते. या कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभागातील प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. गोविंद पवार यांच्यावतीने आयोजित स्वागत गीताने झाली. जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर व ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजनही याप्रसंगी झाले. पुढे बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले की, भाषा ही नदीप्रमाणे प्रवाही असते. भाषेच्या माध्यमातून आपले ज्ञान, कल्पना, विचार, संकल्पना ह्या व्यक्त होत असतात. त्या त्या भूभागातील मातृभाषेतून शिक्षण दिल्यास व्यक्तीचा सर्वांगीण विकास होत असतो. मराठी भाषा ही अनेक बोलींनी मिळून तयार झालेली भाषा आहे. त्यामुळे ती अधिक समृद्ध आहे. महात्मा चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास यासारख्या मध्ययुगीन संतांनी ही भाषा समृद्ध केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा होता. आजही जगभरात मराठी भाषिक व्यक्ती अनेक भेटतात. भाषा अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी त्या त्या भाषिक तरुणांनी समाजकारण, राजकारण, धर्मकारण, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व्यवसाय, उद्योग यात भरीव अशी कामगिरी करायला हवी. तरच ती भाषा दीर्घायुषी ठरते. मराठी भाषेबरोबरच आजच्या माहिती - तंत्रज्ञानाच्या काळात हिंदी, इंग्रजी, रशियन, पाली, जर्मनी, संस्कृत यासारख्या अनेक विविध भाषा अवगत करून बहुभाषिक बनण्याचा प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. दिनेश मौने म्हणाले की, प्रादेशिक भाषेविषयी अलीकडच्या काळात जनमानसामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात अनास्था पसरलेली दिसून येते. परकीय भाषेविषयी ओढ प्रचंड प्रमाणात दिसते. अशा काळात आपल्या मातृभाषेवर प्रेम करून भाषा संवर्धन करण्याची नितांत गरज असल्याचे ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय समारोपात मा श्री मन्मथआप्पा लोखंडे म्हणाले की, भाषेशियाव समाज बहिरा असतो. माणसाने भाषा घडविली आणि भाषेमुळे माणूस घडला. आतापर्यंतच्या मानवी विकासाच्या इतिहासाला भाषाच कारणीभूत आहे. म्हणून संस्काराची खरी जननी मातृभाषा आहे. सर्वांनी मातृभाषेतूनच आपले प्राथमिक शिक्षण घेणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागातील प्रा. धोंडीबा भुरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. श्रद्धा मिसर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. रमेश तडवी, प्रा. केशव बिरादार, प्रा. रवी सोनोने, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. मनोज वैरागकर, डॉ. टी. घनश्याम, प्रा. कल्पना गिराम, डॉ. किरण शिंदे, प्रा. मारूती माळी, डॉ. धनंजय झाल्टे, प्रा. शिवेश्वर मुचाटे, प्रा. दिलीप पस्तापुरे, प्रा. भाग्यश्री वाघमारे, डॉ. संतोष शेटे, प्रा. दयानंद बिडवे, प्रा. कल्पना झांबरे, डॉ. राहूल डोंबे, प्रा. शेखर पंचाक्षरी, प्रा. सागर ठाकूर, प्रा. शंकर भोसले यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी - विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# भूसणी येथे पशु चिकित्सा व औषधोपचार शिबीर संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील दुग्धशास्त्र विभाग, प्राणीशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांचा ध्यास-ग्राम-शहर विकास विशेष युवक वार्षिक शिबिर अंतर्गत मौजे भूसणी येथील पशु चिकित्सा व औषधोपचार शिबिरास पशुधन ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिराचे उद्घाटन पशुधन विकास अधिकारी डॉ. एच. जी. निंबाळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. डी. व्ही. हराळकर, डॉ. डी. बी. शेल्लाळे, डॉ. ए. एम. शेख, डॉ. राजेश कदम, एन. आर. देशमुख, प्राणीशास्त्र आणि दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनायक वाघमारे, दुग्धशास्त्र विभागातील डॉ. गुणवंत बिरादार, सरपंच विरभद्र स्वामी, उपसरपंच धोंडीराम माने, पोलिस पाटील अण्णासाहेब पाटील, बालाजी हुलसुरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे आणि डॉ. संजय गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात २४ गर्भ तपासणी, १७ वंध्यत्व तपासणी, ६६ औषधोपचार, २२ जंत निर्मूलन आणि १२ गोचीड निर्मूलन अशा एकूण १४१ पशुधनावर तज्ञ डॉक्टराकडून तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले. यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉ. एच. जी. निंबाळकर, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनायक वाघमारे, डॉ. गुणवंत बिरादार यांनी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय गवई यांनी केले तर आभार डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी योगेश मोदी, संतोष येचवाड, भीमाशंकर दळवी, माधव पांचाळ विश्वनाथ पर्वत, पूजा कुलकर्णी, वैभव चव्हाण, धनराज माने, रोहित गायकवाड, गणेश चव्हाण, आकाश शिंदे, योगेश्वर मुळे, शिरीष चोथवे, गणेश भावे, आकाश जाधव, गणेश जाधव यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील सहभागी स्वयंसेवक-सेविका आणि गावातील ग्रामस्थानी परिश्रम घेतले.

# वाड्यात भाजपच्या बुथ सशक्तीकरण प्रशिक्षण वर्गाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व पालघर जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील यांच्या निर्देशानुसार आज (ता.४) रोजी वाडा येथील जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात बुथ सशक्तीकरण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. छत्रपती शिवाजी महाराज व दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले. या सशक्तीकरण प्रशिक्षण वर्गाला प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, महीला आघाडी, कृषी आघाडी, युवा मोर्चा, शक्तीकेंद्र प्रमुख, विस्तारक आदी अपेक्षित होते. या प्रसंगी ठाणे ग्रामीणचे प्रभारी व जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, उपजिल्हाध्यक्ष संदीप पवार, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, मंडल प्रभारी प्रशांत संखे, जेष्ठ नेत्या शुभांगी उत्तेकर, कृष्णा भोईर, मनिष देहेरकर, राजू दळवी, कुणाल साळवी, राजेश रिकामे, माजी. महीला व बालकल्याण सभापती धनश्री चौधरी, माजी सभापती अश्विनी शेळके, जिल्हा महीला आघाडी उपाध्यक्ष अर्चना भोईर, महीला आघाडी तालुकाध्यक्षा अंकिता दुबेले, ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष कांतीलाल गोरे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंचाड येथील सरस्वती विद्यामंदिरमध्ये आशीर्वाद व निरोप समारंभ

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील कंचाड येथील सरस्वती विद्यामंदिरमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ तथा आशीर्वाद समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संजय आंबावणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना परीक्षेत यशस्वी होण्यासाठी अभ्यास, मेहनत, जिद्द, ध्येय निश्चितीचे महत्त्व सांगून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रमुख पाहुणे शाळा कमिटी अध्यक्ष, मोईम धांगे, जिल्हा परिषद सदस्या अक्षता चौधरी, पां.जा. हायस्कूलचे मुख्याध्याक आर.एस. पाटील आदी उपस्थित होते. शाळेचे मुख्यध्यापक सी. के. पाटील यांनी यांनी विद्यार्थिनींना 'गैरमार्गाशी लढा' अभियानाची शपथ दिली. कंचाड येथील शाळेत ९८% विद्यार्थी हे गरीब, मोलमजुरी करून संसाराचा गाडा चालवणारे कुटुंबातील आहेत. या आशीर्वाद समारंभाला विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने पेहरावात करत तारपा व लेझिम नृत्याने पाहुण्यांचे जंगी स्वागत केले. या वेळी विद्यार्थ्यांचे पालक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालेय जीवनात गेली ५ वर्ष एकत्र काढत शिक्षक आणि मित्र मैत्रिणींशी जिव्हाळा निर्माण झाला असल्याने भविष्यात आपण एकत्र असू की नसू या विचाराने मुले भावनिक झाली होती. पाहूणे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने शाळेमध्ये भाऊक वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पेश ठाकरे यांनी केले आभार प्रदर्शन वर्गशिक्षक ठाकरे सर तर कार्यक्रमाचा समारोप शिक्षिका सुजाता जोशी यांच्या मधूर आवाजात पसायदानाने झाला.

# 'अशीच आहे चित्ता जोशी' मध्ये मैथ्थिली जावकर सोबत स्टारपुत्र रणजीत जोग नायकाच्या भूमिकेत!





**लातूर/प्रतिनिधी**

प्रख्यात दिग्दर्शिका सुधाताई करमरकर, प्रयोगशील दिग्दर्शक चेतन दातार आणि प्रतिभावंत दिग्दर्शक सत्यदेव दुबे यांच्या तालमीत अभिनयाचे धडे गिरवून, नंतर व्यावसायिकला प्रकाश बुद्धिसागर, दिलीप कोल्हटकर, गणेश यादव, संतोष पवार, आणि चंद्रकांत कुलकर्णी अश्या मातब्बर दिग्दर्शकांसोबत थिएटर करत रंगभूमीवर पाय रोवून भक्कमपणे आपलं अस्तित्व निर्माण करण्यात यशस्वी असलेली लोकप्रिय अभिनेत्री मैथ्थिली जावकर आज अभिनय, नृत्य, लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती अशी पंचरंगी लीलया पेलत लवकरच रसिकांना नव्या साजात दिसणार आहे. तिच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या 'अशीच आहे चित्ता जोशी' या महत्वाकांक्षी नाटकाद्वारे ती पुन्हा रंगमंचावर अवतरणार आहे.

'संस्कार भारती'(कोकण प्रांत) यांच्या सहयोगाने, 'ओम साईनाथ प्रॉडक्शन्स' निर्मित, 'श्री चित्र- चित्रलेखा' प्रकाशित २ अंकी सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशीच आहे चित्ता जोशी या अत्यंत वेगळ्या संवेदनशील नाटकाची लेखिका, निर्माती, दिग्दर्शिका, आणि चित्ता जोशी या शीर्षक भूमिकेत मैथ्थिली जावकर रंगमंचावर लवकरच दिसणार आहे. तसेच घराघरात लोकप्रिय झालेल्या रामायण मालिकेतील 'भरत' अर्थात अभिनेते संजय जोग यांचा सुपुत्र आणि आजच्या टेलिव्हिजन युगातला चमचमता तारा, अभिनेता रणजीत संजय जोग ह्या नाटकात प्रमुख नायकाच्या भूमिकेत आहे. सध्या मुंबईतील पार्ले परिसरात या नाटकाच्या सपाटून तालमी सुरु असून लवकरच मुंबईतील नाट्यगृहात या नाटकाचा रंगमंचावर शुभारंभ होणार आहे. मैथ्थिली जावकर या गुणी अभिनेत्रीने चित्रपट, नाटक, मालिका अश्या सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. अभिनय, नृत्य निर्मिती अश्या सर्व आघाड्यांवर त्यांनी अनेक वर्ष काम करून आपला एक प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे. भरत नाट्यम या नृत्यकलेत पारंगत असलेल्या मैथ्थिली जावकर हिने आजमितीस शेकडो व्हिडीओ अल्बम्स, लावणी, लोकनृत्याचे शो प्रत्यक्ष सादर केले आहेतच पण त्यासोबत स्टार प्रवाहवरील लोकप्रिय 'अग्निहोत्र', 'वादळवाट', 'चार दिवस सासूचे', 'दामिनी', 'घरकुल' 'इन्स्पेक्टर' अश्या ३७ मराठी मालिका तसेच 'चारचौघी', 'शोभायात्रा', 'वा सुनबाई वाह!', 'आई परत येतेय', 'बायको असून ब्रम्हचारी!', 'सहकुटुंब.कॉम', 'दांडेकरांचा सल्ला' अश्या अनेक लोकप्रिय १८नाटकांमधून भूमिका केल्या आहेत. 'आधारस्तंभ', 'छबू पळाली सासरला', 'आई मला माफ कर', 'आता मी कशी दिसते?', 'बायको आली बदलून', 'आयला लोच्या झाला रे', 'खंडोबाच्या नावाने चांगभलं', 'माहेर चा निरोप', 'शांती ने केली क्रांती', 'मेनका उर्वशी' इत्यादी २२ मराठी चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. तिने 'कलर्स मराठी'च्या मराठी 'बिग बॉस' सिझन २' शोमध्येही सहभाग घेतला होता. अत्यंत वेगळ्या धाटणीच्या 'अशीच आहे चित्ता जोशी' ह्या नाटकाच्या निमित्ताने निमित्ताने मैथ्थिली व्यावसायिक नाटकाची लेखिका आणि दिग्दर्शिका बनते आहे. या नाटकात रणजीत संजय जोग, रुचीर गुरव ( स्वाभिमान फेम मयंक ), यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. एका ज्वलंत विषयावरील धगधगतं नाटक खास रसिकांसाठी येत असून नेमकी कशी आहे चित्ता जोशी? हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांनी शुभारंभाचा प्रयोग चुकवू नये.

## वाडा तालुक्यात जेष्ठ कवी कुसुमाग्रज यांची जयंती साजरी

वाडा : मराठी राजभाषा दिनानिमीत्ताने वाडा तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शंभर वर्षाची परंपरा असलेल्या वाडा येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात नव- नवीन पुस्तकांचे दालन उपलब्ध करून देण्यात आले होते. वाचनालयात पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. समाजात वाचनसंस्कृती अधिक रुजावी या हेतूने नवनवीन पुस्तके वाचकांपर्यंत पोहचावीत या हेतूने वाचकांसाठी पुस्तकांचे दालन खुले करण्यात आल्याचे महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष निलेश गंधे यांनी सांगितले. या उपक्रमाला वाचकांनी मोठी गर्दी केली होती.

वकील : ज्योत्सना वर्तक

### जाहीर नोटीस

**वसई येथील मा.श्री.अ.वि.मुसळे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**

चौकशी अर्ज क्र. : १९/२०२३
निशाणी क्र. : ०६
पुढील तारीख : २३/०३/२०२३

**राजन महेंद्र तिवारी**
**रा. ६ ए/५०७, नक्षत्रा ग्रीन्स, डॉन बॉस्को हाई शाळा जवळ,**
**नायगाव ईस्ट, जूचंद्र, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०१ .... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही .... सामनेवाले**

ज्यापेक्षा कै. नेहा राजन तिवारी राहणार रा. ६ ए/५०७, नक्षत्रा ग्रीन्स, डॉन बॉस्को हाई शाळा जवळ, नायगाव ईस्ट, जूचंद्र, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०१ हे तारीख २० माहे ऑगस्ट २०१७ रोजी मयत झाले. अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदार यांनी कै. नेहा राजन तिवारी यांच्या मृत्यूनंतर शासकीय व निम शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा उक्त अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा दि. २३/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता त्याने या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या. या जाहिरनाम्यावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू कै. नेहा राजन तिवारी यांचे कायदेशीर वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दिनांक ०२ माहे मार्च २०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

कोर्टाचा शिक्क

**हुकुमावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर, वसई**

### आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर

**जाहिर ई-निविदा-३/डीएचओ/पालघर/२०२२-२३**
**निविदा सूचना : निविदा क्र. (सन २०२२-२३)**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर हे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी विद्युत रोधक यंत्रणा (Lightning Arrester) बसविणे करिता नामांकित उत्पादक कंपनी/पुरवठादार यांचेकडून ई-निविदेद्वारे खाली नमूद केलेल्या साहित्यांची online निविदा मागवित आहेत. सदर निविदेबाबत विस्तृत माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

वरील नमूद साहित्याची निविदा दि. ०४/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून दिनांक ११/०३/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत Online Download व Online Submission पद्धतीने स्वीकारण्यात येतील व दिनांक १३/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता उघण्यात येतील.

या पुढील शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**


### साप्ताहिक 'क्राईम संध्या'च्या मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन फॉर्म नं.४ (नियम ८ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| १) **प्रकाशन स्थळ** | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| २) **प्रकाशन काळ** | : | साप्ताहिक |
| ३) **मुद्रकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| ४) **प्रकाशनकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| ५) **संपादकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |

मी, धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**दिनांक : ०६ मार्च २०२३**

**धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे**
**प्रकाशक**


साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल.... www.crimesandhya.com

## कोमसापतर्फे वसईत मराठी भाषा गौरव दिन संपन्न

# पैशांच्या, अधिकाधिक सुख सुविधांच्या मागे धावणारा उच्च मध्यम वर्ग मराठीचा सर्वात मोठा शत्रू आहे -ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अंबरीश मिश्र





ज्येष्ठ पत्रकार तथा सुप्रसिद्ध साहित्यिक अंबरीश मिश्र यांच्या हस्ते पत्रकार रुपेश वाढे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

**वसई/प्रतिनिधी**

मराठीची उपेक्षा घरातून स्वतःच करून, आपल्या पाल्यांना तीचा योग्य संस्कार द्यायला आपणच कमी पडत आहोत. पाश्चात्य देशांचे वाईट पद्धतीने अनुकरण आपल्याकडे केले जाते, मात्र त्यांच्याकडून काही चांगलं शिकत नाही. पैशाच्या, अधिकाधिक सुख सुविधांच्या मागे धावणारा उच्चमध्यम वर्ग हा मराठी भाषेचा सर्वात मोठा शत्रु असल्याची टिका ज्येष्ठ पत्रकार, तथा सुप्रसिद्ध साहित्यिक अंबरीश मिश्र यांनी आज वसईत केली.

कोकण मराठी साहित्य परिषदेची वसई शाखा आणि न्यु इंग्लिश स्कुल कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, तसेच बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेने पुरस्कृत केलेला कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्तचा जागतिक मराठी राजभाषा दिन सोहळा वसईत आज सकाळी न्यू इंग्लिश स्कुल सभागृहात संपन्न झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वसईच्या सहाय्यक पोलीस आयुक्त सौ. पद्मजा बढे, कोमसापचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिलराज रोकडे, ज्येष्ठ साहित्यिका विणाताई गवाणकर, कोमसाप वसई शाखेचे कार्याध्यक्ष रेमंड मच्याडो आणि न्यु इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या शोभना वाझ यावेळी मंच्यावर उपस्थित होते. या सोहळ्यात 'मराठी भाषाः ताल आणि तोल' या विषयावर अंबरीश मिश्र यांचे व्याख्यान झाले.ते पुढे म्हणाले, मराठी भाषा ही अमृतधारा आहे, मात्र ती दुर्लक्षीत होत आहे. आजच्या ५०-६० वयोगटातील पालकांचे मुलांच्या मानसिक, वैचारिक, सांस्कृतिक संगोपनाकडे लक्ष नाही. खाणेपिणे, नट्टापट्टा, परदेशी गमनात ही पिढी रंगली आहे. त्यात पालकांचा दोष अधिक आहे. तुम्ही मराठी बोलत नाही, वाचत नाही, वाचायला लावत नाही. नटवेपणा, भपकेपणा,देखावेपणात वेळ घालवत चालला आहात. मुलांना एखादे पुस्तक मागवून त्याचा लळा लावण्याचा प्रयत्न दिसत नाही. त्यामुळे मुलांनाही बाहेरुन खाणंपिणं मागवता येते. पण एखादे पुस्तक मागवायची त्यांना माहिती नाही. अशी खंत मिश्र यांनी यावेळी ...पान ६ वर

## देवणी नगरपंचातीच्या घनकचरा व्यवस्थापन ठेकेदारावर कठोर कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर व्ही.एस.पँथरचा मोर्चा!




**देवणी/प्रतिनीधी**

घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कंत्राटी मजुरांचे संबंधित स्वामी एजन्सी या ठेकेदाराने मजुरांना किमान वेतन कायदा लागू असतांना सुद्धा कायद्याचे उल्लंघन करून १२५०० ते १५०००हजार रुपये यांना कामाचा मोबदला देण्याऐवजी केवळ त्यांना सहा हजार रुपये देऊन सफाई कामगार मजुराचे आर्थिक व रक्त शोषणाचे काम हा भ्रष्ट ठेकेदार करीत आहे ,मजुरांचे रक्त शोषण करून शासनाची फसवणूक करणाऱ्या स्वामी एजन्सीवर कार्यवाई करा या प्रमुख मागणीसाठी व्ही. एस. पँथरच्या वतीने २० मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढणार असल्याचे निवेदन व्ही एस पँथरचे जिल्हाध्यक्ष बालाजी बनसोडे यांनी जिल्हाधिकारी यांना ...पान ६ वर

## शासनाच्या विविध योजनांची माहिती कलापथकाने केली सादर



**लातूर/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील उटी खू. येथे ३ मार्च रोजी स्वर साधना भजनी मंडळ कलापथकाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमाती व नवबौध्द घटकांतील नागरीकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणार्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने २८ फेब्रुवारी २०२३ ते ३ मार्च २०२३ पर्यंत कालावधीत औसा तालुक्यातील मातोळा, नागरसोगा, शिवणी बु., तुंगी बु. उटी बु., वांगजी, चिंचोली तपसे व लातूर तालुक्यातील अंकोली, करकट्टा, चाटा, बाभळगाव, सारोळा आदि गावामध्ये रमाई घरकुल योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभीमान योजना, अनुसूचित जातीच्या बचत ...पान ६ वर

## देवणीत छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल महाराज व संत गाडगे महाराजांच्या जयंतीनिमित्त विचारांचा प्रबोधन कार्यक्रम संपन्न

**देवणी/प्रतिनीधी**

देवणी येथे मुर्गी चौकात बामसेफ,भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, लहुजी क्रांती मोर्चा, बहुजन मुक्ती पार्टी, राष्ट्रीय मूलनीवासी बहुजन कर्मचारी संघ व प्रोटान च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज संत सेवालाल महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून राष्ट्रीय किसान मोर्चाचे राज्य प्रभारी बालाजी कांबळे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बामसेफ चे राष्ट्रीय उपाध्यक्ष व्हि. व्हि. जाधव उपस्थित होते.




छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे रयतेचे राज्य होते. स्वराज्यात रयत सुखी होती. स्वराज्य हे केवळ हिंदूंसाठी नव्हे तर अठरापगड जातीच्या व सर्व धर्मातील लोकांच्या वर होणारा अन्याय अत्याचार रोखण्यासाठी निर्माण केलेले होते. शिवाजी महाराजांच्या काळात होणाऱ्या लढाया या धर्मासाठी नव्हे तर साम्राज्यविस्तार साठी होत असत परंतु आज लोक शिवाजी महाराजांचे नाव घेऊन हिंदू-मुस्लीमात फूट पाडण्याचे काम करत आहेत. असे मत शिवश्री प्राध्यापक अजित जाधव यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात अनेक मुस्लिम सरदार महाराजांच्या अंगरक्षक सारख्या महत्त्वाच्या हुद्द्यावर होते त्याचे अनेक दाखले देत छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मनिरपेक्ष राजे असल्याचे मत शिवश्री डॉ. जीमेल आत्तार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात माननीय व्हि. व्हि. जाधव यांनी देवणी ही क्रांतीची भूमी आहे असे सांगत महापुरुषांच्या कार्यामुळेच आज आपण सन्मानाने जगत आहोत बळीराजा संत तुकाराम महाराज महात्मा बसवेश्वर छत्रपती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांना इथल्या व्यवस्थेने धोकाबाजी करून संपवलेला आहे त्यांचे विचार संपवण्यासाठी त्यांचे साहित्य नष्ट केले , जे संपवता आले नाही ते विकृत केले, वर्तमान परिस्थिती सुद्धा बहुजनांना संपविण्याचाच काम करत आहे. वर्तमान परिस्थितीत ईव्हीएम चा वापर करून लोकशाहीस धोक्यात आणली आहे जवळजवळ संपविलीच आहे. लोकशाही वाचवायची असेल तर बामसेफच्या वतीने आयोजित ईव्हीएम ...पान ६ वर

## वसई-विरार शहरामध्ये डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या वतीने महास्वच्छता अभियान!

**वसई/प्रतिनिधी**



महाराष्ट्रभुषण डॉ. तिर्थरूप श्री नानासाहेब धर्माधिकारी तथा नारायण विष्णू धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीपूर्तीचे औचित्य साधून डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने आज बुधवार दि. १ मार्च २०२३ रोजी सकाळी ७ वाजता विरार, वसई व नालासोपारा क्षेत्रातील मुख्यरस्त्यांवर महास्वच्छता मोहिम राबविण्यात आली. स्वच्छ भारत अभियानाचे' महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपालांनी नियुक्त केलेले स्वच्छतादूत डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानाचे अध्यक्ष पद्मश्री' ने सन्मानित डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी तथा दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी व डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महास्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा हे एक सेवादायी समाजाभिमुख उपक्रम राबविणारे प्रतिष्ठान आहे. या भव्य स्वच्छता अभियानामध्ये एकूण ६ हजार ४७७ श्रीसदस्य स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. एकूण ५१ हजार ३४० किलो (५१.३४० टन) सुका कचरा व ९ हजार ८३४ किलो (९.८३४ टन) ओला कचरा असा एकूण ६१ हजार १७४ किलो (६१.१७४ टन) कचरा गोळा करण्यात आला. या महास्वच्छता अभियानामध्ये स्थानिक नगरसेवक, 'होली क्रॉस हायस्कूल, निर्मळ' या शाळेचे फादर व काही विद्यार्थी, 'चिन्मय मिशन वसई' व 'वसई ह्युमन केअर ट्रस्ट'चे काही सदस्य तसेच या विभागातील नागरिक सहभागी झाले होते. हा मोठ्या प्रमाणात संकलित केलेला कचरा वाहून नेण्याकरिता विरार वसई शहर महापालिका प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले.

## हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा सामंतशाही विरुध्द आधुनिकता -कौस्तुभ दिवेगावकर

**लातूर/प्रतिनिधी**




हैद्राराबाद मुक्तिसंग्राम हा धार्मिक लढा नसून तो सामंतशाही विरुद्ध आधुनिकतेचा लढा होता, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर लातूर, येथील सामाजिक शास्त्रे संकुलातर्फे आयोजित 'मराठवाड्याची मुक्तिगाथा' या विषयावर आयोजित कार्यक्रमात कौस्तुभ दिवेगावकर यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक प्रा. डॉ.एस. एच.कडेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून कौस्तुभ दिवेगावकर संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे तसेच भाऊसाहेब उमाटे, इतिहास अभ्यासक, लातूर व प्रा. डॉ. सुनील पुरी इतिहास विभाग प्रमुख, श्री कुमार स्वामी महाविद्यालय औसा हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून तंत्रज्ञान संकुलाचे संचालक डॉ. विकास हुंबे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिलकुमार जायभाये यांनी केले. पुढे बोलताना कौस्तुभ दिवेगावकर असे म्हणाले की, आपल्या मातीशी असलेले आपले सांस्कृतिक अनुबंध समजणे म्हणजे इतिहासाची जाणीव असणे होय. कोणत्याही इतिहासाचा अभ्यास करताना त्याचा समकालीन संदर्भ समजणे आवश्यक आहे. इतिहासाकडे विविध व समग्र दृष्टीकोनातून आपणास बघता आले पाहिजेत. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा सामंतशाही विरुध्द आधुनिकता असा आहे . असे मत व्यक्त केले. भाऊसाहेब उमाटे यांच्या मते, हैद्राबाद मुक्तिसंग्राम लढा हा लोकशाहीचा लढा आहे. यावेळी प्रा. डॉ. सुनील पुरी यांनी हैद्राबाद मुक्तिसंग्राम लढ्याच्या अनुषंगाने दुर्मिळ ग्रंथ व वृत्तपत्राचे प्रदर्शन आयोजित केले होते. त्यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ. एस.एच. कडेकर असे म्हणाले की, मराठवाड्याच्या मुक्ती ...पान ६ वर

## समाजातील सुशिक्षित लोकांनी मतदान प्रक्रियेत सक्रीय सहभागी होणे आवश्यक-डॉ.हरिश्चंद्र चौधरी



**भूसणी/प्रतिनिधी**

संपूर्ण विश्वामध्ये भारत हा लोकशाहीचा पुरस्कार करणारा देश म्हणून ओळखला जातो. आपल्या देशातील लोकशाही ही इतरांसाठी प्रेरणादायी आहे त्यामुळे समाजातील सुशिक्षित लोकांनी मतदान प्रक्रियेमध्ये सक्रिय आणि सकारात्मक पद्धतीने सहभागी होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरिश्चंद्र चौधरी यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, भुसणी यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास विशेष युवक वार्षिक शिबिर प्रभारी प्राचार्य डॉ. दिनेश मौने व उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे भुसणी येथे दि. २७ फेब्रुवारी ते ०५ मार्च २०२३ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरातील बौद्धिक व्याख्यानांमध्ये मतदार जनजागृती या विषयावर ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते यावेळी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जितेंद्र देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. यशवंत वळवी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. संजय गवई आणि युवा कार्यकर्ते शुभम स्वामी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. चौधरी म्हणाले की, आपल्या देशाची लोकशाही कार्यप्रणाली ही सर्वांसाठी आदर्शवत आहे. मतदान प्रक्रियेमध्ये समाजातील अशिक्षित लोकांचा सहभाग हा महत्त्वपूर्ण असतो मात्र सुशिक्षित लोकांचा सहभाग हा अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. त्यामुळे समाजामध्ये मतदान जनजागृती करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. यशवंत वळवी म्हणाले की, आज विद्यापीठ आणि विविध महाविद्यालयाच्यावतीने ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून समुदायातील लोकांमध्ये मतदान जनजागृती विषयी माहिती दिली जात आहे हा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवकांनी गावांमध्ये जाऊन मतदान प्रक्रियेबद्दल लोकांशी चर्चा करून त्यांना माहिती दिली पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. जितेंद्र देशमुख म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ...पान ६ वर

## विशाल गिरी प्रस्तुत लव्हेरिया चित्रपटाच्या पोस्टरचे प्रदर्शन!

**लातूर/प्रतिनिधी**




गौरी इंटरटेनमेंट आणि विशाल गिरी यांची निर्मिती आणि दिग्दर्शन असणाऱ्या लव्हेरिया या चित्रपटाच्या पोस्टरचे प्रदर्शन चित्रपटातील प्रमुख कलाकारांच्या उपस्थितीत लातूर येथे संपन्न झाले. या चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण जिल्ह्यातच होणार आहे.स्थानिक कलाकारांनाही त्यात संधी देण्यात आलेली आहे. लातूर मधील पूजा शिंदे या तरुणीला मुख्य भुमिका देण्यात आलेली आहे. पूजा शिंदे ही विशाल गिरी क्टिंग स्कूलची विद्यार्थीनी आहे. ॲकॅडमी मधील २२ कलाकार या चित्रपटात काम करत आहेत. प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावणारे विनोदी कथानक या चित्रपटात असणार आहे, अशी माहिती दिग्दर्शक विशाल गिरी यांनी यावेळी बोलताना दिली. चित्रपटातील प्रमुख कलाकार प्रसाद शिखरे, हर्षदा पाटील, वैष्णवी पाटील, दिनेश भुर्के यांच्यासह कलाकार आणि निर्मात्या सुनंदा तुगावकर, आलमला येथील प्रा.मालपाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत पोस्टरचे प्रदर्शन संपन्न झाले. लातूरसारख्या शहरात आणि ग्रामीण भागात खूप मोठी संधी आहे. येथील कलाकारांमध्ये गुणवत्ता आहे. निर्माता व दिग्दर्शन करण्याचे कौशल्य लातूरमध्ये आहे. त्याचा प्रत्यय हा चित्रपट पाहताना दर्शकांना येईल, ...पान ६ वर